- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २५० | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# एसआयआर सर्वेक्षणात ७५.५२ लाख मतदारांचा ठावठिकाणा नाही

## पहिला टप्प्यात १७.६३ लाख मतदारांची नावे दुबार

**वृत्तसंस्था, मुंबई :** राज्यातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा (एसआयआर) पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. या प्रक्रियेत राज्यातील ९.७८ कोटी मतदारांपैकी ७५.५२ लाख मतदार अनुपस्थित आहेत किंवा सापडले नाहीत. तर १७.६३ लाख मतदारांची नावे दुबार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

एसआयआर अंतर्गत तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर महिनाभर दावे व हरकती नोंदविण्यासाठी मुदत दिली जाईल. यादीत नाव नसलेल्या मतदारांना आणि १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांना फॉर्म ६ भरून नाव नोंदविता येणार आहे.

एसआयआर ३० जून ते १७ ऑगस्टदरम्यान बूथस्तरीय अधिकाऱ्यांनी (बीएलओ) राज्यात घरोघरी जाऊन गणना अर्ज जमा केले. ९.७८ कोटी मतदारांच्या अर्जापैकी २.०७ कोटी मतदारांचे गणना अर्ज संकलित झाले नाहीत. यापैकी ७५.५२ लाख मतदार अनुपस्थित अथवा सापडले नाहीत, तर ७६.८० लाख मतदार कायमस्वरूपी स्थलांतरित झाले आहेत. ३४.८१ लाख मतदार मृत असून, १७.६३ लाख मतदारांची नावे अन्यत्र आधीच नोंदलेली किंवा दुबार असल्याचे आढळले आहे. अन्य कारणांमुळे २.२३ लाख अर्ज या श्रेणीत आहेत.

**अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर रोजी**

असंकलित मतदारांच्या तात्पुरत्या याद्या संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळांवर चार दिवसांपूर्वी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. राजकीय पक्षांच्या बूथस्तरीय प्रतिनिधींना या याद्यांतील मतदारांबाबत माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले असून पात्र मतदारांकडून आवश्यक अर्ज मिळवून त्याची बीएलओमार्फत पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुरुस्तीसाठी फॉर्म ८, तर मतदाराचे नाव वगळण्यास हरकत घेण्यासाठी फॉर्म ७ दाखल करता येईल. खोटी माहिती किंवा घोषणा दिल्यास लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५० च्या कलम ३१ नुसार एक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.



**थोडक्यात**

### महागाई भत्त्यात २ टक्के वाढ

**मुंबई :** राज्य सरकारी आणि इतर पात्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के इतका झाला आहे. महागाई भत्त्यातील ही वाढ पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे जानेवारी २०२६ पासून लागू होईल. वित्त विभागाने मंगळवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. वाढीव महागाई भत्ता ऑगस्ट २०२६ पासून लागू आहे. तर जानेवारी २०२६ ते जुलै २०२६ या सात महिन्याच्या कालावधीतील थकबाकीची रक्कम सुद्धा ऑगस्ट महिन्याच्या वेतनसोबत रोखीने दिली जाणार आहे. राज्यातील सुमारे ५ लाखाहून अधिक शासकीय कर्मचारी तसेच सुमारे ८ लाखापेक्षा अधिक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

### भंडाऱ्यात अल्पवयीन मित्राने घेतला शाळकरी मुलाचा जीव

**भंडारा :** शांत आणि सुरक्षित शहर अशी ओळख असलेल्या भंडाऱ्यात गेल्या काही दिवसांपासून घडणाऱ्या गंभीर गुन्हेगारी घटनांनी शहराच्या सुरक्षिततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मंगळवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास मेंढा परिसरातील नेहरू गार्डनजवळ एका अल्पवयीन शाळकरी मुलाची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली. अंशु गजानन येरकडे (१५) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. विशेष म्हणजे या हत्येतील संशयितही अल्पवयीन असल्याची माहिती समोर आली आहे.

## जागतिक छायाचित्रण दिन



**'एका क्लिकमध्ये निसर्गाचा एक सुंदर अध्याय कायमचा जतन झाला**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** पक्ष्याच्या डोळ्यातील चमक, पिसांवरील रंगछटा आणि त्याची मोहक उभी राहण्याची ढब, छायाचित्रणातील बारकावे किती सुंदर असतात, याची ही साक्ष. छायाचित्र म्हणजे केवळ कॅमेऱ्यात बंदिस्त केलेली प्रतिमा नाही; तो एखाद्या क्षणाचा इतिहास, भावनेचा ठसा आणि निसर्गाच्या सौंदर्याची जपलेली आठवण असते. योग्य क्षणी, योग्य प्रकाशात आणि योग्य नजरेतून टिपलेले एक छायाचित्र हजारो शब्दांपेक्षा अधिक प्रभावी ठरते. समोर दिसणाऱ्या या सुंदर पक्ष्याच्या छायाचित्रात निसर्गाची विविधता, पक्ष्याचे सौंदर्य आणि छायाचित्रकाराची निरीक्षणशक्ती एकाच वेळी अनुभवायला मिळते. **(छायाचित्र : समिर गावंडे, नागपूर)**

# आम आदमी पार्टीचे नेते सत्येंद्र जैन यांना एसीबीकडून अटक

## मोदी सरकारचा अंत निश्चित, केजरीवालांचा आरोप

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

आम आदमी पार्टीचे नेते सत्येंद्र जैन यांना एसीबीनं अटक केली आहे. मागील सरकारच्या काळातील दिल्ली जल बोर्डातील कथित भ्रष्टाचाराप्रकरणी एसीबीनं ही कारवाई केली आहे. आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक आणि माजी मंत्री अरविंद केजरीवाल यांनीी भाजपवर हल्लाबोल केला आहे. सत्येंद्र जैन यांना भाजपनं पुन्हा एकदा अटक केलं आहे. काही काळापूर्वी या लोकांनी जैन यांना तुरुंगात टाकून त्यांची जी परिस्थिती केली होती, ती सर्वांना माहिती आहे. पहिली केस खोटी होती, ही केस देखील खोटी सिद्ध होईल, असं केजरीवाल म्हणाले.

**भाजपची हुकूमशाही कधीपर्यंत चालणार, केजरीवालांचा सवाल**

अरविंद केजरीवाल म्हणाले की अखेर कधीपर्यंत भाजपची हुकूमशाही सुरु राहणार आहे? मनाला वाटेल तसे खोटे आरोप करुन तुरुंगात टाकतात. भाजपचा खोटेपणा पुन्हा देशासमोर येईल मात्र, तुरुंगात घालवलेला वेळ आणि मानसिक त्रास याची भरपाई कोण करणार? असा सवाल केजरीवाल यांनी केला. भाजपच्या पापाचा घडा आता भरला आहे, त्यांना कितीही हुकूमशाही करु द्यात, मोदी सरकारचा अंत निश्चित आहे.



संपूर्ण आम आदमी पार्टी आणि देशातील जनता सत्येंद्र जैन यांच्यासोबत उभी असल्याचं अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं.

आपचे नेते मनीष सिसोदिया यांनी देखील एक्सवर पोस्ट केली आहे. पंजाब निवडणुकीपूर्वी पंजाबचे सहप्रभारी सत्येंद्र जैन यांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी अडीच वर्षांपर्यंत खोट्या प्रकरणात सत्येंद्र जैन यांना तुरुंगात ठेवण्यात आलं. आता आणखी एक खोटं प्रकरण काढलं आहे, असं सिसोदिया म्हणाले. जेन झी आंदोलन, राम मंदिरातील दान चोरी आणि ई-२० च्या मुद्यांवरुन अडचणीत असलेली भाजप आता पुन्हा एकदा ईडी, एसीबी आणि सीबीआयच्या जुन्याच निवडणुकीतील फॉर्म्युल्याचा वापर करत असल्याचा आरोप सिसोदिया यांनी केला.

**भाजपचा आपवर पलटवार**

दिल्ली भाजपचे माजी अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी आपवर पलटवार केला आहे. सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत ते म्हणाले की दिल्लीला लुटणाऱ्यांचा खरा चेहरा समोर आला आहे. आम आदमी पाटीर्चे नेते आणि दिल्ली सरकारमधील माजी मंत्री सत्येंद्र जैन यांच्याविरोधात मोठी कारवाई, एसीबीनं दिल्ली जल बोर्डाच्या एसटीपी टेंडर घोटाळ्यातील अनियमितता आणि भ्रष्टाचार प्रकरणात सत्येंद्र जैन यांना अटक केलं असल्याचा दावा सचदेवा यांनी केला.

जनतेच्या पैशांवर टेंडरमधील हेराफेरी आणि कोट्यवधींची लाच, हेच आपचे ईमानदार मॉडेल असल्याचं वीरेंद्र सचदेवा यांनी म्हटलं. पाणी आणि स्वच्छतेच्या नावावर मतं मागितली, कमिशनखोरी केली गेल्याचा आरोप सचदेवांनी केला. दिल्लीच्या जनतेनं यांचं सत्य ओळखलं होतं, आता एका एका चोरीचं उत्तर देण्याची जबाबादरी आपची असल्याचा दावा सचदेवांनी केला. अरविंद केजरीवाल यांनी केलेली पापं जनतेसमोर आल्याचं देखील सचदेवा म्हणाले.

# शेजारी देश भारताला घेरण्याच्या तयारीत?

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

तुर्कीचे वर्तमानपत्र येनी शफाकने एक वृत्त छापून पाकिस्तान आणि तुर्की बांगलादेशलाही आपल्या गटात खेचण्याचा प्रयत्न करत असल्याच्या चर्चेला चांगलीच हवा दिली. या वर्तमानपत्राने एका लेखात जर बांगलादेश हा सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्की यांच्या सुरक्षा सहकार्य करारात सामील झाला तर याचा दक्षिण आशियाच्या राजकारणावर मोठा परिणाम होणार असल्याचे भाकीत नोंदवले आहे. या लेखात बांगलादेशला या फ्रेमवर्कमध्ये सामील करण्याबाबत अजून अधिकृत निर्णय झालेला नाही. येनी शफाफच्या म्हणण्यानुसार जर ढाका या संरक्षण करारात सामील होते तर त्याच्या परराष्ट्र धोरणात बदल होत आहे हा एक मोठा संकेत असेल. या वर्तमानपत्राच्या म्हणण्यानुसार बांगलादेश बांगलादेश भारतावरील आपली पारंपरिक अवलंबत्व कमी करत चीन, भारत आणि पश्चिमी देशांसोबतच्या रिलेशनशिवाय नवा पर्याय चाचपू शकतो. वृत्तात हे कोणत्या एका देशाच्या विरूद्ध थेट पाऊल नाही. मात्र आपली रणनैतिक स्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न असे दाखवण्यात आले आहे.

**तुर्की, पाकचा बांगलादेशमध्ये रस**

या लेखानुसार पाकिस्तान आणि तुर्की बांगलादेशसोबत संरक्षण सहकार्य वाढवण्यामध्ये रस ठेवतो. विशेष करून तुकीर्चे ड्रोन आणि संरक्षण तंत्रज्ञान बांगलादेशसाठी आकर्षणाचा एक केंद्रबिंदू ठरू शकतो. बांगलादेश आणि तुर्की यांच्यात पहिल्यापासून संरक्षण सहकार्य वाढवण्यासाठी चर्चा सुरू आहे. दोन्ही देशांमधील सहकार्य वाढवण्यासाठी अनेक पावले देखील उचलण्यात आली आहेत.

**भारतासाठी डोकेदुखी?**

या लेखातील विश्लेषणात भारताबाबत विशेष उल्लेख करण्यात आला आहे. जर बांगलादेश इस्लामिक नाटोच्या जवळ जातो तर भारताकडे बांगलादेश सोबतच्या आपल्या नात्याकडे एका वेगळ्या दृष्टीकोणातून पहावे लागेल. भारत आणि बांगलादेश हे जवळपास ४ हजार ९६ किलोमीटरची सीमा शेअर् करतात. व्यापार, नद्यांचे पाणीवाटप बंगालच्या खाडीबाबतचे निर्णय याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

# कालच रुग्णालयातून डिस्चार्ज, आज पुन्हा मनोज जरांगे पाटलांची तब्बेत बिघडली, उपचार सुरु

**वृत्तसंस्था, मुंबई**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना कालच छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णालयातून डिस्चार्ज करण्यात आला होता. त्यानंतर आज पुन्हा एकदा जरांगे पाटलांची तब्बेत बिघडली आहे. अशक्तपणा आणि ताप आल्याने अंतरवाली सराटी येथे त्यांच्यावर सलाईनद्वारे उपचार सुरू करण्यात आले आहेत. दरम्यान, तब्येत ठीक नसल्यामुळे मनोज जरांगे यांनी प्रस्तावित मराठवाडा दौराही रद्द केला आहे.

कालच त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता



दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी नुकताच पश्चिम महाराष्ट्राचा दौरा केला आहे. ८ ऑगस्टपासून १३ ऑगस्टपर्यंत ते पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर होते. या काळात त्यांनी सोलापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यात इशारा बैठका घेतल्या. तसेच या मार्गावरील गावागावातील लोकांशी संवाद साधला होता. दरम्यान, या दौऱ्यानंतर मनोज जरांगे पाटील यांची तब्येत बिघडली होती. त्यानंतर मनोज जरांगे यांच्यावर छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णालयात उपचार सुरू होते. कालच त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. त्यानंतर आज पुन्हा एकदा घरी आणल्यावर त्यांची तब्बेत बिघडली आहे. सध्या त्यांच्यावर अंतरवाली सराटीत उपचार सुरु आहेत.

**अशक्तपणा आणि ताप आल्याने उपचार सुरु**

मनोज जरांगे पाटील यांनी आज पुन्हा अशक्तपणा आणि ताप आल्याने अंतरवाली सराटी येथील सरपंचांच्या घरी त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. तब्येत ठीक नसल्यामुळे मनोज जरांगे यांनी प्रस्तावित मराठवाडा दौराही रद्द केला आहे. दरम्यान, पश्चिम महाराष्ट्राचा दौरा संपवून आल्यानंतर उपचारासाठी जरांगे पाटील यांनी छत्रपती संभाजीनगरमधील गॅलेक्सी रुग्णालयात भरती करण्यात आले होते. एका दिवसाच्या उपचारानंतर ते पुन्हा तात्पुता डिस्चार्ड घेऊन मराठा आरक्षणासंदर्भात अभ्यास असणाऱ्या अभ्यासकांच्या बैठकीसाठी अंतरवाली सराटीत दाखल झाले होते. ही बैठक पार पडल्यानंतर पुन्हा त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगरमधील गॅलेक्सी रुग्णालयात उपचार सुरु करण्यात आले होते. त्यांना व्यवस्थित वाटू लगल्याने काल त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ड करण्यात आला होता. मात्र, आज पुन्हा एकदा त्यांची तब्बेत बिघडली आहे. यानंतर तातडीने अंतरवाली सराटीत त्यांच्यावर उपचार सुरु करण्यात आले आहेत.

दरम्यान, वारंवार उपोषणे करुन मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावत आहे. डॉक्टरांनी त्यांना आमरण उपोषण न करण्याचा सल्ला दिला आहे. मात्र तरी देखील मनोज जरांगे पाटील हे उपो,ण करण्यावर ठाम ओत. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या संदर्भातील पुढील लढा २९ ऑगस्टपासून सुरु करणार असल्याची घोषणा जरांगे पाटील यांनी केली आहे.

संपादकीय लेखणीतून...

## निधी 'वि'कासाचा

सर्वसामान्य नागरिकांना कायम भेडसावणारा प्रश्न म्हणजे विकास निधीचा पैसा नेमका जातो कुठे? खासदार आणि आमदार विकास निधीसाठी सरकारकडून दिला जाणारा पैसा नेमका कुठे खर्च होतो? ही योजना सुरू होऊन तीन दशकांहून अधिक काळ झाला असला तरी या निधीबाबत अनेक गैरसमज, आरोप आणि प्रश्न कायम आहेत. एखादा रस्ता, शाळेची इमारत, पिण्याच्या पाण्याची टाकी, सार्वजनिक शौचालय किंवा आरोग्य सुविधा उभारण्यासाठी हा निधी वापरला जातो, असे सांगितले जाते मात्र प्रत्यक्षात प्रत्येक रुपया योग्य ठिकाणी खर्च होतो का? या योजनेअंतर्गत कोणते प्रकल्प मंजूर होतात? निधी कोणाच्या शिफारशीवर खर्च केला जातो आणि त्याची अंमलबजावणी कोण करते? हे समजून घेणे प्रत्येक करदात्यासाठी महत्त्वाचे आहे. कारण हा पैसा सरकारचा नसून जनतेच्या करातून जमा झालेला असतो त्यामुळे खासदार स्थानिक क्षेत्र विकास निधी, स्थानिक क्षेत्र विकास योजना आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा विकास यांची खरी माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

गत काही वर्षात विविध महालेखा परीक्षकांकडून आणि इतर तपासणी अहवालांमध्ये निधीचा विलंब, अपूर्ण कामे, नियमबा खर्च, निधीचा अपुरा वापर आणि पारदर्शकतेच्या अभावासारखे गंभीर मुद्दे समोर आले आहेत. यामुळे खासदार निधी आणि अनेक राज्यातील आमदार स्थानिक क्षेत्र विकास योजना या योजनांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना ही केंद्र सरकारची महत्त्वाची योजना असून तिची सुरुवात २३ डिसेंबर १९९३ रोजी करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश खासदारांना त्यांच्या मतदारसंघातील तातडीच्या आणि स्थानिक गरजांवर आधारित विकास कामांची शिफारस करण्याची संधी देणे हा आहे. या निधी अंतर्गत रस्ते, शाळा, वाचनालये, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, सार्वजनिक शौचालये, आरोग्य सुविधा, क्रीडा संकुले आणि इतर टिकाऊ सामुदायिक मालमत्ता उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. सध्या या योजनेअंतर्गत प्रत्येक खासदाराला दरवर्षी ५ कोटी पर्यंतच्या कामांची शिफारस करण्याचा अधिकार आहे मात्र, कोविड-१९ काळात एप्रिल २०२० ते नोव्हेंबर २०२१ या कालावधीत ही योजना तात्पुरती स्थगित करण्यात आली होती नंतर ती पुन्हा सुरू करण्यात आली. अनेकांना वाटते की, हा निधी थेट खासदाराच्या ताब्यात असतो. प्रत्यक्षात तसे नाही. खासदाराची भूमिका केवळ विकास कामांची शिफारस करण्यापुरती मर्यादित असते.

निधीचे वितरण, तांत्रिक मंजुरी, गुणवत्ता तपासणी आणि खर्चाचे परीक्षण ही सर्व जबाबदारी जिल्हाधिकारी किंवा संबंधित जिल्हा प्रशासनामार्फत अंमलबजावणी यांच्याकडे असते. निधी मार्गदर्शक तत्त्वे आणि निधी नियमानुसार प्रत्येक कामाची वैधता तपासूनच मंजुरी दिली जाते. त्याच धर्तीवर अनेक राज्यांमध्ये आमदार स्थानिक क्षेत्र विकास योजना किंवा आमदार विकास निधी कार्यरत आहेत मात्र या योजनांचे नियम, निधीची रक्कम आणि अंमलबजावणीची पद्धत प्रत्येक राज्यात वेगवेगळी असल्यामुळे आमदार निधीसाठी देशभरात एक समान नियम लागू होत नाहीत. खासदार निधी योजना केंद्र सरकार चालवते तर आमदार निधी योजना संबंधित राज्य सरकार चालवते. खासदार फक्त विकास कामांची शिफारस करतो. आमदार बहुतेक ठिकाणी कामांची शिफारस करतो; पण नियम राज्यानुसार बदलतात. खासदार निधीच्या कामांची अंमलबजावणी जिल्हाधिकारी किंवा संबंधित अंमलबजावणी संस्था करते. आमदार निधीच्या कामांची अंमलबजावणी जिल्हाधिकारी, संबंधित विभाग किंवा राज्याची नियुक्त संस्था करते. दरवर्षी प्रत्येक खासदाराला ५ कोटींचा निधी मिळतो.

आमदार निधीची रक्कम राज्यानुसार वेगवेगळी असते. खासदार निधीचा उद्देश विकास कामांना गती देण्याचा असला तरी अनेक लेखापरीक्षण अहवालांमध्ये निधीच्या वापरातील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. २००४ ते २००९ या कालावधीत उपलब्ध निधीपैकी सुमारे ३७ ते ५२ टक्के निधीच वापरला गेला तसेच खासदारांच्या शिफारशीशिवाय कामे, नियमबा खर्च, अपूर्ण प्रकल्प आणि मालमत्तेच्या नोंदीतील त्रुटीही आढळल्या. राज्यांतील आमदार निधी योजनांमध्येही अशीच स्थिती दिसते. ओडिशात हजारो विकास कामे अपूर्ण राहिली तर काही ठिकाणी कार्यालयीन खर्च आणि इतर नियमबा कामांसाठी निधी वापरण्यात आला. मिझोराममध्ये सार्वजनिक मालमत्ता उभारण्याऐवजी १.२४ कोटींचा खर्च विविध वस्तूंवर करण्यात आला, त्याच्या योग्य नोंदीही नव्हत्या. अशा घटनांमुळे भ्रष्टाचारासारखे प्रश्न अधिक गंभीर बनतात. यामुळे निधी मंजूर होण्याबरोबरच निधीचा पारदर्शक आणि नियमांनुसार वापर होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणजेच खासदार निधी, आमदार निधी या योजना केवळ निधी वाटपावर अवलंबून नाहीत. त्यांची यशस्वी अंमलबजावणी योग्य नियोजन, पारदर्शकता आणि सातत्यपूर्ण देखरेखीवर अवलंबून असते. प्रत्येक विकास कामाची माहिती, खर्च आणि मालमत्तेची नोंद सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध असणे आवश्यक आहे. मार्गदर्शक तत्त्वे आणि नियमांचे पालन न झाल्यास विकासाऐवजी वाद निर्माण होतात

त्यामुळे प्रत्येक खर्चाची स्वतंत्र पडताळणी आवश्यक आहे. नियमित ऑडिट, सामाजिक लेखापरीक्षण आणि नागरिकांचा सहभाग वाढल्यास सार्वजनिक पायाभूत विकास अधिक परिणामकारक होऊ शकतो आणि सार्वजनिक पैशाचा गैरवापर रोखण्यास मदत मिळू शकते. स्थानिक पातळीवरील विकास कामांना गती देणारे निधी हे महत्त्वाचे साधन आहे. योजनेबाबत मतभेद असले तरी तिचा उद्देश स्थानिक गरजानुसार विकास कामांना चालना देणे हाच आहे. ही योजना अधिक परिणामकारक बनवायची असेल तर प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी, खचार्ची पारदर्शकता आणि नागरिकांसाठी खुली माहिती या गोष्टींना अधिक प्राधान्य द्यावे लागेल. कोणत्याही सरकारी योजनेचे यश केवळ मंजूर निधीवर अवलंबून नसते तर त्या निधीतून नागरिकांच्या जीवनात किती सकारात्मक बदल घडतो, यावरच तिची खरी परिणामकारकता ठरते.

# गळाभेट: जागतिक मैत्रीचे प्रतीक, राहुल गांधी कधी समजणार?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी १३ ऑगस्ट २०२६ रोजी नवी दिल्लीतील रचनात्मक काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या परराष्ट्र धोरणावर टीका करताना "गळाभेट घेणे म्हणजे परराष्ट्र धोरण नव्हे" असे म्हटले व त्याची मिमिक्री केली, ज्यावरून मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. या टीकेदरम्यान त्यांनी काँग्रेस नेत्याची गळाभेट घेऊन कृती करून दाखवली, ज्यामुळे सत्ताधारी भाजपने त्यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली.मैत्री आणि जागतिक संबंधांच्या मुद्द्यावर राजकीय वतुर्ळात पक्षीय भूमिकांनुसार वेगवेगळे दृष्टिकोन पाहायला मिळतात.

परराष्ट्र धोरणात नेत्यांच्या प्रत्यक्ष भेटी आणि गळाभेट (आलिंगन) या देशांमधील संबंध अधिक दृढ करण्याचे आणि राजकीय अंतर कमी करण्याचे प्रभावी माध्यम आहेत. या माध्यमातून जागतिक राजकारणात विश्वास निर्माण होतो, कठीण मुत्सद्देगिरी सोपी होते आणि व्यापार, सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर जलद निर्णय घेणे शक्य होते. परराष्ट्र धोरणातील गळाभेटीची मुत्सद्येगिरी राहुल गांधी हे कधी समजणार? मात्र राहुल गांधी यांनी अत्यंत हिन दर्जाचे राजकारण करत मोदींच्या परराष्ट्र धोरणाची व गळा भेटीची खिल्ली उडवली.

परराष्ट्र धोरणात जागतिक नेत्यांच्या परस्पर भेटी आणि गळाभेट यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे केवळ शिष्टाचाराचे दर्शन नसून आंतरराष्ट्रीय संबंधांना दिशा देणारे एक प्रभावी माध्यम आहे. राहुल गांधीना परराष्ट्र धोरणाचे, बॉडी लॅंग्वेज चे महत्व व गळाभेटीचे महत्त्व समजलेच नाही असे म्हणायचे का? विरोधासाठी विरोध करायचे, प्रसिद्धीत रहायचे हाच बिडा राहुल गांधींनी उचलला आहे.

जेव्हा दोन देशांचे प्रमुख जाहीरपणे गळाभेट घेतात, तेव्हा जगभरात त्यांच्यातील मजबूत मैत्रीचा सकारात्मक संदेश जातो. कठोर वाटाघाटी सोप्या होतात. नेत्यांमध्ये वैयक्तिक सलोखा असेल, तर गुंतागुंतीच्या आणि वादग्रस्त मुद्द्यांवर तोडगा काढणे सोपे जाते. द्विपक्षीय संबंधांना गती मिळते. अशा भेटींमुळे प्रलंबित करार, व्यापार आणि संरक्षण क्षेत्रातील करारांना तात्काळ मंजुरी मिळण्यास मदत होते. मात्र नवी दिल्लीत आयोजित एका परिषदेत, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या मते परराष्ट्र धोरण म्हणजे परदेशी नेत्यांना मिठी मारणे होय. राहुल गांधी यांनी दावा केला की, परराष्ट्र धोरण म्हणजे फक्त नेत्यांची गळाभेट घेणे असा समज पंतप्रधान मोदींच्या मनात घट्ट बसला आहे.देशाचे हित आणि संरक्षण करणे हे पंतप्रधानांचे काम आहे, केवळ सार्वजनिक ठिकाणी दाखवलेली जवळीक किंवा मैत्री नव्हे, असे ते म्हणाले.

राहुल गांधी यांनीअमेरिका-इराणमधील संघर्ष आणि पश्चिम आशियातील परिस्थितीचा संदर्भ देत मोदी सरकारच्या 'विश्वगुरू' प्रतिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. इराण संघर्षात भारताऐवजी पाकिस्तान मध्यस्थ म्हणून समोर येत असल्याचा दावा करत, भारताचे परराष्ट्र धोरण बाजूला पडल्याची टीका त्यांनी केली. तसेच, पंतप्रधान मोदी हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

रचनात्मक काँग्रेस राष्ट्रीय अधिवेशनादरम्यान मंचावर काँग्रेस नेते संदीप दीक्षित यांना मिठी मारून राहुल गांधींनी हे नाट्यमयरीत्या दाखवून दिले. ते उपहासाने म्हणाले, "मला आश्चर्य वाटते की पंतप्रधानांच्या डोक्यात कोणी घातले की आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे परदेशी नेत्यांना मिठी मारणे." राहुल गांधी म्हणाले, "मला समजत नाही की त्यांच्या डोक्यात कोणी किंवा कुठून घातले की परराष्ट्र धोरण म्हणजे राजकारण्यांना जबरदस्तीने जवळ करणे. त्यांच्या अज्ञानाची कल्पना करा." आपल्या दाव्यांना पुष्टी देण्यासाठी, त्यांनी बालपणीचा एक किस्सा सांगितला. त्यांनी स्पष्ट केले की, जेव्हा ते त्यांच्या आजीसोबत (माजी पंतप्रधान इंदिरा गांधी) अमेरिकेला गेले होते, तेव्हा इंदिरा गांधी आणि नॅन्सी रेगन यांच्यात एक संभाषण झाले होते. त्यांनी स्पष्ट केले की आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये केवळ पोझ देणे पुरेसे नाही. राजकीय अपयशाचे आरोपः इराण आणि अमेरिका यांच्यातील सध्याच्या राजकीय तणावाचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले की भारताने एक मोठी संधी गमावली आहे. ते म्हणाले की, जर आज इंदिरा गांधींसारखे कणखर नेतृत्व असते, तर भारताने दोन्ही देशांमध्ये मध्यस्थीची भूमिका बजावली असती. मंचावर नेत्यांनी केलेल्या टिप्पण्या आणि राहुल गांधींच्या वक्तव्यामुळे राजकीय वतुर्ळात बरीच चर्चा आणि वाद निर्माण झाला आहे. राहुलच्या अभद्र टिप्पणी वरून त्यांना परराष्ट्र धोरण म्हणजे काय? हे कळलेच नाही. परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हित महत्वाचे असते. राष्ट्रीय हितसंबंधाची जोपासना करणे हे परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे सार आहे.

परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा देशाच्या सीमा आणि नागरिकांचे बाह्य धोक्यांपासून रक्षण करणे. आर्थिक विकास साधने, इतर देशांसोबत व्यापार वाढवणे आणि परकीय गुंतवणूक आकर्षित करणे. जागतिक शांतता राखणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता आणि सहकार्य टिकवून ठेवणे,.'मित्रराष्ट्र निर्माण करणे, जागतिक राजकारणात मित्र देश व युती तयार करणे, अशी व्यापक उद्दिष्टे विदेशनितीची आहे. परराष्ट्र धोरणात नेत्यांच्या परस्पर भेटी आणि गळाभेट (आलिंगन किंवा व्यक्तिगत संवाद) हे दोन देशांमधील राजकीय जवळीक, विश्वास वाढवण्याचे आणि कूटनीतीचे (मुत्सद्देगिरीचे) एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. या व्यक्तिगत संपर्कामुळे औपचारिक कागदोपत्री चर्चेपलीकडे जाऊन मैत्रीचे व आत्मियतेचे वातावरण तयार होते, ज्यामुळे प्रलंबित प्रश्न सोडवणे सोपे होते.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींची 'गळाभेट मुत्सद्देगिरी:**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा, डोनाल्ड ट्रम्प, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबतच्या त्यांच्या गळाभेटी जागतिक स्तरावर गाजल्या. यामुळे भारताचे या देशांसोबतचे संबंध अधिक दृढ झाले.

**ऐतिहासिक महत्त्व:** भूतकाळातही जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांनी जागतिक नेत्यांसोबत अशाच प्रकारे आत्मीयतेचे संबंध जोपासले होते, ज्यामुळे भारताची अलाइनमेंट नसलेली प्रतिमा मजबूत झाली. हे राहुल गांधीं विसरले का,?

नेत्यांच्या भेटीने कठीण मुद्द्यांवर खुली व स्पष्ट चर्चा होते.व्यापार, संरक्षण आणि तंत्रज्ञानाचे महत्त्वाचे करार वेगाने मार्गी लागतात. उभय देशांमध्ये विश्वास निर्मिती होते दोन्ही देशांच्या सर्वोच्च नेतृत्वात वैयक्तिक पातळीवर विश्वास निर्माण होतो. दोन मोठे देश एकत्र येत असल्याचा संदेश जगभरात जातो. कागदी वा औपचारिक चर्चेपेक्षा समोरासमोर बसून बोलल्याने गैरसमज दूर होतात मोठ्या व्यावसायिक गुंतवणूक, तंत्रज्ञान आदान-प्रदान आणि करारांवर शिक्कामोर्तब होते. दहशतवादविरोधी लढा आणि संरक्षण साहित्याची देवाणघेवाण सुलभ होते. आत्मविश्वास वाढतो. दोन्ही देशांमधील राजकीय जवळीक वाढून मित्रराष्ट्र म्हणून पाठिंबा मिळतो. गळाभेटीचे (बॉडी लॅंग्वेज) महत्त्व वैयक्तिक जवळीक दर्शवते. नेत्यांमधील मैत्रीपूर्ण हावभाव जनतेला आणि जगाला सकारात्मक संदेश देतात. गंभीर वाटाघाटींदरम्यान एक आपुलकीचे वातावरण तयार होण्यास मदत होते. आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये देशाची प्रतिमा मजबूत आणि आक्रमक किंवा मित्रत्वाचे नेते म्हणून उजळून येते. प्रोटोकॉलच्या पलीकडे जाऊन संबंधांमध्ये जवळीक निर्माण होते. तणावपूर्ण मुद्यांवर चर्चा सुरू असताना एका भेटीने किंवा गळाभेटीने वातावरण हलके व सकारात्मक होते. अशा कृतींमुळे आंतरराष्ट्रीय माध्यमांचे लक्ष वेधले जाते आणि द्विपक्षीय संबंधांमधील दृढता अधोरेखित होते. परराष्ट्र धोरणात केवळ कागदी करार महत्त्वाचे नसतात, तर नेत्यांमधील 'बॉडी लॅंग्वेज' देखील महत्त्वाची भूमिका बजावते. गळाभेट ही जागतिक राजकारणात दोन देशांमधील मैत्रीचे आणि समान उद्दिष्टांचे जिवंत प्रतीक मानली जाते.

**जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा उंचावत आहे:**

पंतप्रधान नरेंद्र मोदींची 'गळाभेट मुत्सद्देगिरीमुळे जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा अधिक मजबूत, स्वाभिमानी आणि प्रभावी देश म्हणून उदयाला आली आहे. आंतरराष्ट्रीय मंच, आर्थिक प्रगती आणि सांस्कृतिक कुटनीतीच्या बळावर भारताचे महत्त्व जागतिक राजकारणात वाढले आहे.

जगात भारताची प्रतिमा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा परस्पर जवळचा संबंध आहे. गेल्या काही वर्षांत भारताने जागतिक पातळीवर एक मजबूत आणि स्वावलंबी देश म्हणून ओळख निर्माण केली आहे. भारताने विकसनशील देशांचा प्रमुख नेता म्हणून स्वतःला स्थापित केले आहे.जी-२० चे यशस्वी अध्यक्षपद भूषवून २०२३ मधील जी -२० शिखर परिषदेच्या यशाने भारताची आयोजन क्षमता आणि राजनैतिक वजन जगाला दाखवून दिले. अमेरिका, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया आणि यूएई (वअए) सारख्या देशांसोबत भारताचे संबंध ऐतिहासिकदृष्ट्या अधिक मजबूत झाले आहेत.

भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनला आहे, डिजिटल क्रांती, (डिजिटल पेमेंट) आणि कोविन सारख्या स्वदेशी तंत्रज्ञानाचे जगाने कौतुक केले आहे.'मेक इन इंडिया': भारताला जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनवण्याच्या प्रयत्नांमुळे जागतिक पुरवठा साखळीत भारताचे महत्त्व वाढले आहे.रशिया-युक्रेन युद्धादरम्यान पश्चिमेकडील देशांचा दबाव असूनही भारताने स्वतःच्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले आणि रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे सुरू ठेवले.शांततेचा संदेशः "हे युद्धाचे युग नाही" हा मोदींचा संदेश जागतिक स्तरावर शांततेचा मंत्र बनला.

गळाभेट किंवा आलिंगन देणे ही भारतीय संस्कृतीतील जिव्हाळ्याची आणि आदराची परंपरा मानली जाते. त्याद्वारे जागतिक मंचावर भारताची 'सॉफ्ट पॉवर' दाखवण्याचा प्रयत्न केला जातो.या नेत्यांशी झाली गळाभेटः अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन, संयुक्त अरब अमिरातीचे शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान, आणि इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांसारख्या प्रमुख जागतिक नेत्यांसोबतच्या त्यांच्या गळाभेटी आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांमध्ये नेहमीच चर्चेत राहिल्या आहेत.

- ९५६१५९४३०६

# जेव्हा मैदानावरील 'न्यायाधीश' अचानक बदलतो: कसोटी क्रिकेटमधील दुर्मिळ व नाट्यमय पंच-बदलांची गाथा

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

गॉल आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारत आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी सामन्यादरम्यान ऑस्ट्रेलियन पंच रॉड टकर यांची तब्येत अचानक बिघडली आणि त्यांच्या जागी टीव्ही पंच म्हणून काम पाहणारे पाकिस्तानी पंच अहसान रझा यांना तडक पांढरा कोट घालून मैदानात उतरावे लागले. बांगलादेशचे पंच शरफुद्दौला सैकत यांच्या साथीने रझा यांनी उर्वरित दिवसांची धुरा सांभाळली. ही घटना ताजी असली, तरी कसोटी क्रिकेटच्या शतकोत्तर प्रवासात जेव्हा जेव्हा मैदानावरील पंचांनी अचानक मैदान सोडले, तेव्हा मैदानावर अजब आणि रंजक नाट्य पाहायला मिळाले आहे.

क्रिकेटच्या मैदानावर चेंडू आणि फळी यांच्यातील थरार रंगत असताना संपूर्ण जगाचे लक्ष २२ खेळाडू आणि त्यांच्या कौशल्यावर खिळलेले असते. खेळाडू जखमी होणे, स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर जाणे किंवा त्यांच्या जागी 'कन्कशन सबस्टिट्यूट' मैदानात उतरणे या आता नित्याच्या गोष्टी झाल्या आहेत. परंतु, ज्यांच्या निर्णयावर संपूर्ण खेळाचा डोलारा उभा असतो, ते मैदानावरील पंचच अचानक सामना सोडून बाहेर पडले आणि त्यांच्या जागी दुसराच पंच उभा राहिला, तर ती घटना क्रीडाविश्वात अत्यंत दुर्मिळ आणि लक्षवेधी ठरते.

**मैदानातील अनाउन्समेंट आणि थेट प्रेक्षकांतून आलेला पंच**

कसोटी इतिहासातील सर्वांत रंजक आणि अविस्मरणीय प्रसंग घडला होता १९९३ च्या शेस मालिकेत. ट्रेंट ब्रिज येथे इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पहिला कसोटी सामना सुरू होता. सामन्यादरम्यान प्रसिद्ध इंग्रज पंच जॉन होल्डर यांच्या पायाचे स्नायू अचानक ताणले गेले आणि त्यांना उभे राहणेही असह्य झाले. त्या काळात आजच्यासारखी प्रत्येक सामन्यासाठी आंतरराष्ट्रीय राखीव पंचांची फौज तैनात नसे.

होल्डर मैदानाबाहेर गेल्यानंतर मैदानातील पब्लिक अॅंड्रेस सिस्टीमवरून थेट प्रेक्षकांना उद्देशून घोषणा करण्यात आलीः "स्टेडियममध्ये कोणताही पात्र पंच उपस्थित आहे का?" सुदैवाने, प्रथम श्रेणी सामन्यांचा अनुभव असलेले पॉल व्हाईट प्रेक्षकांमध्ये बसून सामन्याचा आनंद घेत होते. त्यांनी त्वरित प्रतिसाद दिला, ड्रेसिंग रूममध्ये जाऊन कोट परिधान केला आणि थेट अँशेस कसोटीत पंच म्हणून उभे राहिले. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील ही सर्वांत वेगवान आणि अनपेक्षित 'पदोन्नती' मानली जाते.



**क्षेत्ररक्षकाचा भिरकावलेला चेंडू आणि पंचांची दुखापत**

पंचगिरी हे केवळ उभं राहून बोट वर करण्याचे काम नाही, तर तिथे प्रचंड शारीरिक धोकेही असतात. २०१६ च्या भारत विरुद्ध इंग्लंड मुंबई (वानखेडे) कसोटीत अशीच एक थरारक घटना घडली होती. भुवनेश्वर कुमारने सीमारेषेवरून फेकलेला चेंडू मैदानावरील पंच पॉल रायफेल यांच्या डोक्याच्या मागील बाजूस जोरात लागला. रायफेल मैदानावरच कोसळले. त्यांना त्वरित रुग्णालयात दाखल करावे लागले आणि टीव्ही पंच मराईस इरास्मस यांनी तातडीने मैदानात धाव घेत पंचगिरीची सूत्रे हाती घेतली.

असाच प्रकार अनेकदा उष्णतेच्या लाटेमुळे आणि 'डिहायड्रेशन'मुळे घडला आहे. श्रीलंकेसारख्या उष्ण व दमट हवामानाच्या देशात सलग पाच दिवस उन्हात उभे राहणे पंचांच्या कसोटी पाहणारे ठरते. बी. सी. कुरे यांच्यासारख्या निष्णात पंचांनाही अशाच उष्माघातामुळे सामना अर्ध्यात सोडून पॅव्हेलियनमध्ये परतावे लागले होते.

**पंचांच्या बदलीची पडद्यामागील कार्यपद्धती**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) आचारसंहितेनुसार पंचांची अचानक बदली करण्यासाठी एक काटेकोर प्रोटोकॉल ठरलेला असतोः

जर मैदानावरील पंचांपैकी कोणाची प्रकृती खालावली किंवा दुखापत झाली, तर सर्वप्रथम टीव्ही पंच (थर्ड अंपायर) मैदानावर उतरतात. टीव्ही पंचांची रिकामी झालेली जागा स्थानिक किंवा आंतरराष्ट्रीय 'चौथे पंच' (फोर्थ अंपायर) भरून काढतात.

जर चौथ्या पंचांनाही तांत्रिक अडचण आली, तर स्थानिक क्रिकेट मंडळाकडे नोंदणीकृत असलेला अनुभवी राखीव पंच तात्काळ उपलब्ध केला जातो.

**मैदानातील मूक पहारेकऱ्यांची कसोटी**

क्रिकेटमध्ये खेळाडूंना थकवा आल्यास ड्रिंक्स ब्रेक किंवा पर्यायी क्षेत्ररक्षकाची सोय असते; परंतु पंचांना प्रत्येक चेंडूवर डोळ्यांची पापणी न झुकवता पाच दिवस एकाग्र राहावे लागते. गॉल कसोटीत रॉड टकर यांच्या जागी पाकिस्तानी पंच अहसान रझा यांचे अचानक मैदानात उतरणे हे क्रिकेटच्या नियमांमधील लवचिकता आणि पंचांच्या मानसिक तयारीचे उत्तम उदाहरण आहे.

जेव्हा जेव्हा अशी अनपेक्षित संकटं येतात, तेव्हा क्रिकेटच्या इतिहासात खेळाडूंच्या विक्रमांसोबतच अशा अनाहूत पंचांची आणि त्यांच्या अनपेक्षित पदार्पणाची कथाही कायमस्वरूपी नोंदवली जाते.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# अख्खं शहर झोपेत, नगराध्यक्षा ॲक्टिव्हावर ऑन फिल्ड !

## पाठबंधारे विभागाच्या क्वॉर्टरमध्ये दोन महिन्यांत तिसरी घरफोडी, स्नेहा मुन यांच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
**अमर मोकाशी**

शहर गाढ झोपेत असताना चोरट्यांचा धुमाकूळ सुरू असून पोलिसांची गस्त नेमकी कुठे आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. मोखाबर्डी उपसा सिंचन योजनेच्या क्वॉर्टरमध्ये दोन महिन्यांत तिसऱ्यांदा घरफोडी झाल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सोमवारी मध्यरात्री तीन चोरट्यांनी बंद क्वॉर्टर फोडल्यानंतर झोपलेल्या स्नेहा मुन यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मुन यांनी प्रसंगावधान राखून दरवाजा आतून बंद केल्याने मोठा अनर्थ टळला.



रविवारी (१६) मध्यरात्री तीन अज्ञात चोरट्यांनी मोखाबर्डी योजनेच्या कार्यालय परिसरातील कनिष्ठ लिपिक अंजली माथुरकर व कविता काटोले यांच्या बंद क्वॉर्टरचे कुलूप तोडले. त्यानंतर त्यांनी स्नेहा मुन यांच्या क्वॉर्टरकडे मोर्चा वळविला. घराला बाहेरून कुलूप असले तरी आत स्नेहा मुन झोपलेल्या होत्या. चोरट्यांच्या हालचालींचा आवाज आल्याने त्या जाग्या झाल्या. आरडाओरड न करता त्यांनी दरवाजा आतून बंद करून सहकाऱ्यांना फोनवरून माहिती दिली. या घटनेत तीनही चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली; मात्र चोरट्यांचा अद्याप माग लागलेला नाही.

**दोन महिन्यांत चोरीच्या घटनांची मालिका**

मोखाबर्डी परिसरात चोरीच्या घटना वाढल्या आहेत. १९ जून रोजी शासकीय वाहनातील बॅगेतून दिवसाढवळ्या २ लाख ८३ हजार रुपये चोरीला गेले. १३ जुलै रोजी तास कॉलनीतील घरातून ३३ ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास करण्यात आली. त्याच रात्री मोखाबर्डी कार्यालय परिसरातील सहा क्वॉर्टर्स फोडण्यात आली होती. या घटनांनंतरही चोरटे मोकाट असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

**पोलिसांवर विसंबून न राहता नगराध्यक्षा रस्त्यावर**

दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यानंतर नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे सोमवारी (१७) रात्री सुमारे बाराच्या सुमारास स्वतःच्या ॲक्टिव्हावरून शहरात फिरल्या. त्यांनी मोखाबर्डी क्वॉर्टर्समध्ये जाऊन स्नेहा मुन, कविता काटोले व रिना खेळूत यांची भेट घेत सुरक्षेची विचारपूस केली. त्यानंतर तास कॉलनी, धमार्पूर, भिमादेवी देवस्थान, शिवाजी ले-आऊट, आझाद चौक, कुंभार मोहल्ला, मानी मोहल्ला, कलारओळी चौक, रामधन चौक, टी हाऊस चौक व सिद्धार्थनगर परिसरात रात्री दीड वाजेपर्यंत पाहणी केली. नागरिकांशी संवाद साधून सुरक्षेच्या समस्या जाणून घेतल्या.

**आता पोलीस अधीक्षकांच्या दारात प्रश्न**

वाढत्या चोरीच्या घटनांची गंभीर दखल घेत नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे लवकरच पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन भिवापूरमधील परिस्थितीची माहिती देणार आहेत. शासकीय कार्यालये व कर्मचाऱ्यांच्या क्वॉर्टर्सही सुरक्षित नसतील तर सामान्य नागरिकांनी सुरक्षेसाठी कोणाकडे पाहायचे, असा सवाल उपस्थित होत आहे. चोरट्यांचा बंदोबस्त करून रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

गस्तीवेळी सभापती रिना खापरीकर, नगरसेविका जया नंदनवार, सभापती पिंटू श्रीरामे, विवेक ठाकरे, गटनेते दिनेश रामटेके आदी उपस्थित होते.

## मौदा येथे १५ ऑगस्ट भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिवस साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

मौदा शहरात विविध शासकीय निमशासकीय कार्यालय आणि शाळा व महाविद्यालय येथे भारतीय स्वातंत्र्याचा ८० वे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सोहळ्यासाठी शाळेचे मैदान आकर्षक रांगोळ्या आणि तिरंगी पताक्यांनी सजवले होते. उपविभागीय कार्यालय तसेच तहसील कार्यालय मौदा येथे उपविभागीय अधिकारी संजय पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मौदा येथे श्री केशव स्वामी शिक्षण संस्था उपाध्यक्ष देवरथजी भागलकर यांनी तर ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल मौदा संस्थेचे सहसचिव राजेंद्रजी जयस्वाल यांनी ध्वजारोहण केले. नगरपंचायत मौदा येथे नगराध्यक्ष प्रसन्न तिडके यांनी तर पोलीस स्टेशन मौदा येथे पोलीस निरीक्षक सारीन दुर्गे यांनी ध्वजारोहण केले.




विविध ठिकाणी शाळेच्या लेझीम आणि बँड पथकाने शिस्तबद्ध संचलन करत प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मौदा येथे ध्वजारोहण सोहळ्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते सादर केली. जनता विद्यालय इथे झालेल्या या सोहळ्याला मुख्याध्यापक अनिल मेश्राम श्री केशवस्वामी शिक्षण संस्था अध्यक्ष महेश हटेवार, सचिव रवींद्र पिसे नगराध्यक्ष प्रसन्न तिडके उपनगराध्यक्ष शुभम तिघरे, सर्व नगरसेवक उप मुख्याध्यापक नामदेव तांबडे, पर्यवेक्षक यशवंत मस्के व गजेंद्र नासरे, पोलीस निरीक्षक सारीन दुर्गे गटशिक्षणाधिकारी संकेत मरसकोल्हे, केंद्रप्रमुख, सर्व संस्था संचालक तसेच मौदा परिसरातील अनेक नागरिक, पालक, सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दलितमित्र राजाभाऊ जाधव यांच्या "अगदी सहज म्हणून" पुस्तकाचे प्रकाशन

**दै. सिंहवााणी वृत्त,**
**मुंबई-रवींद्र मालुसरे**

काही गोष्टी आपण ठरवून करत नाही. त्या नकळत घडत जातात आणि पुढे आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग बनून राहतात. वाचलेले जे आवडते त्याचा संग्रह आणि त्यानिमित्ताने लेखनही कदाचित असेच असते. मनात एखादा विचार येतो, एखादी घटना मनाला स्पर्शून जाते, एखादी व्यक्ती काहीतरी शिकवून जाते, वाचनाचे वेड असेल तर आवडलेली वाक्ये वहीत उतरवून ठेवण्याची सवय जडते आणि मग त्या अनुभवाला शब्द देण्याची इच्छा होते. त्यातूनच माज्या चार पुस्तकांचा जन्म झाला. ह्यअगदी सहजह्ण हे पुस्तकही अशाच सहज उमटलेल्या विचारांचे, अनुभवांचे आणि भावनांचे, जमवलेल्या कात्रणांचे संकलन आहे.



सहज हा शब्द दिसायला छोटा असला तरी त्यामध्ये जीवनाचे मोठे तत्त्व दडलेले आहे. माणूस मोठमोठ्या गोष्टींच्या शोधात असतो; पण त्याच्या आयुष्यातील खरे आनंद, दुःख, नाती, संघर्ष आणि आठवणी अनेकदा अगदी साध्या-सोप्या प्रसंगांत दडलेल्या असतात. त्या क्षणांकडे संवेदनशील नजरेने पाहिले, की त्यातून विचार जन्म घेतात आणि विचारांना शब्द मिळाले की साहित्य निर्माण होते. मनात आलेलं काही सांगायचं, जाणवलेलं काही लिहायचं आणि ते वाचकांपर्यंत पोहोचवायचं. आज याच नावाचे माझे वेगळे चौथे पुस्तक आज प्रकाशित होत आहे, ते मी माझे ज्येष्ठ बंधू रमण जाधव यांना वाढदिवसाची भेट म्हणून अर्पण करीत आहे. दलितमित्र तथा शिवसेना नेते राजाभाऊ जाधव यांच्या "अगदी सहज म्हणून" या पुस्तकाच्या चौथ्या भागाचे प्रकाशन

नालासोपारातील समाज उन्नती मंडळाच्या सभागृहात संपन्न झाले. याप्रसंगी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. विजया वनमाळी आणि राजश्री अवासंक यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या सोहळ्याला महापौर अजीव पाटील, प्राचार्य डॉ. सखाराम डाखोरे,गाव कमिटीचे अध्यक्ष राजेंद्र वाळींजकर, समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष संजय वाळींजकर उपस्थित होते.

दिर्घ आजाराशी सामना करत असतानाही राजाभाऊंचा लेखनाचा,सामाजिक कायार्चा उत्साह पाहून आम्हाला प्रेरणा,उर्जा मिळते असे गौरवोद्गार यावेळी महापौर अजीव पाटील यांनी काढले. तर मागील तीन पुर्स्तकांप्रमाणे राजाभाऊंचे विचार वाचण्यासाठी आपण आतुर झालो असल्याचे प्रा.डाखोरे यांनी कथन केले.

राजाभाऊ पुढे असेही म्हणाले की, रमणभाऊ हे माझे थोरले बंधुच नव्हे तर माज्या आयुष्यातील मार्गदर्शक आहेत.त्यांच्यामुळेच माझी इथवर यशस्वी वाटचाल झाली आहे. या पुस्तकातून मी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. कार्यक्रमाला नालासोपारा येथील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## कुलगुरूंचा नबीरातील जेन-झी सोबत थेट संवाद

### कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांमध्ये एनईपी-२०२०विषयी केली जागृती, विद्यार्थ्यांशी थेट संवादाचा नागपूर विद्यापीठाचा प्रथमच उपक्रम, तंत्रज्ञानातील बदल-शैक्षणिक प्रश्नांबाबत, विद्यापीठीय निर्माण होणाऱ्या समस्या बाबत कुलगुरूंचा ॲक्शन मोड प्लॅन, ग्रामीण विद्यार्थ्यांशी थेट संवादामुळे शैक्षणिक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

भारत सरकारच्या एनईपी-२०२० या नवीन शैक्षणिक धोरणांच्या जागृतीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे कुलगुरू डॉ. मनाली क्षिरसागर यांनी महाविद्यालयांना भेटी देऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्याचा उपक्रम हाती घेतलेला आहे. त्यानुसार नागपूर ग्रामीण मधील नबिरा महाविद्यालय, काटोल येथे नागपंचमीच्या दिवशी मा. कुलगुरू डॉ. मनाली क्षिरसागर यांनी नबीरातील जेन-झी सोबत थेट संवाद साधला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण होऊन उत्साह निर्माण झाला.



नागपूर ग्रामीण मधील महाविद्यालयांना भेटी देण्याचा झंजावती दौरा मा. कुलगुरूंचा नागपंचमी दिनी नबीरा महाविद्यालय, काटोल येथील एकदिवशीय संवाद कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी मंचावर मा. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, विद्यार्थी विकास प्रभारी संचालक डॉ. विजय तांगडे, प्राचार्य डॉ. सुनील कुमार नवीन, उप प्राचार्य डॉ. विकास बारसाकडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. पुनीत राऊत उपस्थित होते. तंत्रज्ञानातील बदल आणि समकालीन सामाजिक प्रश्नांबाबत कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी आयोजित दौऱ्यादरम्यान मार्गदर्शन केले. या संवादात्मक सत्रात विद्यार्थ्यांना आपल्या समस्या मांडण्याची तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण च्या विविध पैलूंबाबत समाधान करण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांशी संवाद साधत यावेळी शैक्षणिक, परीक्षा, संशोधन तसेच विद्यार्थ्यांशी संबंधित विविध विषयांवर कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी सविस्तर चर्चा केली. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेत बदलत्या शैक्षणिक, परीक्षा, अभ्यासक्रम व्यवस्थेबाबत विविध बाबी स्पष्ट केल्या. या संवाद दरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व व प्राध्यापकांनी विविध प्रश्न निर्माण करून एनईपी-२०२० च्या अंमलबजावणीवर विशेष चर्चा घडून आली. नवीन महाविद्यालयांना मान्यता, कॉपी सेंटर, प्रवेश प्रणाली, उत्कृष्ट प्राध्यापक, वर्कलोड, एक्सेस, परीक्षा प्रणाली, संगणकीय तांत्रिक अडचणी, विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत निर्माण झालेले प्रश्न, NEP ची एक सूत्रता, OE, IKS, CC, FP, CEP अशा विविध प्रश्नांवर व या वर्षापासून लागू केलेली थ्री-टू-वन प्रणाली याबाबत या संवादात विविध प्रश्न निर्माण झाले असता उपस्थितांना विशेषतः विद्यार्थ्यांना मा. कुलगुरू यांनी मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक स्वातंत्र्याची माहिती देत, उपलब्ध संधींचा प्रभावीपणे उपयोग करण्याचे आवाहन व निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे लगेच निराकरण विद्यापीठ व शासकीय पातळीवर करण्याचे आश्वासन कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी दिले.

विद्यार्थ्यांनी संशोधनासाठी नाविन्यपूर्ण कल्पना आणि संभाव्य संशोधन प्रकल्पांना प्राधान्य देण्याचे आवाहन त्यांनी केले. Gen Z, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) संस्कृती आणि विद्यार्थ्यांवर सोशल मीडियाचा प्रभाव यांसारख्या आधुनिक व समकालीन विषयांवर सांगोपांग चर्चा करण्यात आली. पारंपरिक विषयांच्या पलीकडे जाऊन संशोधनात्मक दृष्टिकोन विकसित करण्याचे तसेच तंत्रज्ञान आणि सामाजिक बदलांचा समकालीन समाजावर होणारा परिणाम चिकित्सक पद्धतीने अभ्यासण्याचे आवाहन त्यांनी केले. दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या विद्यार्थी आंदोलनावरही विचारांची देवाणघेवाण यावेळी करण्यात आली. तरुणांवर असलेला शैक्षणिक व सामाजिक दबाव तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या आव्हानांवर विद्यार्थ्यांनी आपली मते व्यक्त केली.

विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि समाजाशी संबंधित घडामोडींबाबत जागरूक, चिकित्सक आणि सक्रिय राहावे, असे आवाहन डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केले. या मुक्त आणि संवादात्मक सत्रामुळे विद्यार्थ्यांना आपले विचार मोकळेपणाने मांडता आले तसेच कुलगुरूंसोबत अर्थपूर्ण संवाद साधता आला. या संवादाचा समारोप अत्यंत सकारात्मक आणि माहितीपूर्ण वातावरणात झाला. विद्यार्थ्यांना एनईपी-२०२०, परीक्षा सुधारणा, संशोधनाच्या संधी, शैक्षणिक स्वातंत्र्य, तंत्रज्ञानातील बदल आणि समकालीन सामाजिक प्रश्नांबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, सामाजिक जागरूकता आणि संशोधनाची जिज्ञासा वाढीस लागण्यास मदत झाली.

या एकदिवसीय संवाद कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कुमार नवीन यांनी केले, तर संचालन वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. वैशाली रुईकर तर कार्यक्रमाचे आभार आयक्यूएसी समन्वयक डॉ. पुनीत राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. चंदू देशपांडे, डॉ. जयंत कळंबे, प्रा. मुकेश जाधव, डॉ. कोमल नबीरा, डॉ. घागरगुंडे, डॉ. विकास गंधारे, डॉ. कटरे, डॉ. भरत कडबे, प्रा. हरिश किनकर, डॉ. विपिन काळपांडे यांनी तथा कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापक व ज्युनिअर महाविद्यालयातील शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम केले. तसेच यावेळी विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी होती.

थोडक्यात

## भगिनी मंडळात 'सोलो डान्सिंग क्वीन' स्पर्धा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भगिनी मंडळ, नागपूरच्यावतीने श्रावणधारा अंतर्गत महिलांसाठी 'सोलो डान्सिंग क्वीन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, ६ सप्टेंबर रोजी होणार आहे. स्पर्धेसाठी ३० वर्षे व त्यावरील महिला सहभागी होऊ शकतील. स्पर्धेचा नृत्यप्रकार बॉलिवूड असून, प्रत्येक सहभागीला २ ते ३ मिनिटांचा नृत्याविष्कार सादर करता येईल. विजेत्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देण्यात येईल. स्पर्धेसाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख १ सप्टेंबर २०२६ असून इच्छुक महिलांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धेची वेळ व ठिकाण लवकरच कळविण्यात येणार आहे.

## नागपंचमी निमित्त जि. प प्राथमिक शाळा तोंडली येथे विविध उपक्रमांचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

नागपंचमीच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली येथे इयत्ता पहिली ते पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक, कलात्मक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पाटीवर नागाचे चित्र व सरस्वतीचे चित्र रेखाटले तसेच टाकाऊ कागदापासून आकर्षक नाग तयार करून आपल्या कलागुणांना वाव दिला. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सर्पमित्रांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांनी सापांविषयी विविध प्रश्न विचारून त्यांच्या जीवनाविषयी, सवयींविषयी, विषारी व बिनविषारी सापांच्या जाती तसेच निसर्गातील त्यांच्या महत्त्वपूर्ण स्थानाविषयी माहिती जाणून घेतली.

शाळेच्या मुख्याध्यापिका कु. अनुराधा धुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम घेण्यात आला. साप हा निसर्गातील एक महत्त्वाचा घटक असून पर्यावरणाचा समतोल राखण्यात त्याची महत्त्वाची भूमिका आहे, असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच सर्पदंशाची घटना घडल्यास कोणत्याही अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता तात्काळ वैद्यकीय मदत घ्यावी आणि जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी जावे, असे आवर्जून सांगण्यात आले. नागपंचमी सणाचे सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगतानाच सापांविषयी असलेली भीती व गैरसमज दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोनातून सापांकडे पाहण्याचा आणि निसगार्तील प्रत्येक जीवाचे महत्त्व समजून घेण्याचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. इयत्ता पहिली ते पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासोबतच त्यांच्यामध्ये पर्यावरणप्रेम, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सर्पसंवर्धनाविषयी जागरूकता निर्माण झाली.

## एसआयआर च्या शेवटच्या दिवशी ग्रामपंचायत गांगणेर (हिवरा) चे १००% काम पूर्ण, मतदान यादीतून १०२ मतदार झाले कमी



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

सोमवार १७ ऑगस्ट निवडणूक आयोगाने एसआयआर करण्याची शेवटची तारीख दिली होती. आज ग्रामपंचायत गांगणेर (हिवरा) येथील बीएलओ आशा वर्कर राऊत यांना ग्रामपंचायत कार्यालय विचारपूस केली असता, त्यांनी एसआयआरचे काम शंभर टक्के पूर्ण झाल्याचे सांगितले. एकूण ७६५ मतदारांपैकी ६६३ मतदारांची एसआयआर पूर्ण झाले असून ज्या मतदारांचे एसआयआर झाले नाही असे १०२ मतदारांचे नावे मतदान यादीतून कमी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उद्या मंगळवार १८ ऑगस्ट पासून अठरा वर्षे पूर्ण झालेल्यांचे नवीन फॉर्म भरणे, दुरुस्ती करण्याचे काम सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे नवीन मतदारांनी उद्यापासून फॉर्म भरून घेण्याचे व ज्या मतदारांच्या नावात काही दुरुस्ती करायची असल्यास तेही दुरुस्त करण्याचे आव्हान बीएलओ यांनी केले आहे.

## गुमगाव शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुमगाव क्रमांक १ येथे ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मोनाली प्रशांत लोनबैले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी व उपस्थितांनी राष्ट्रगीत गायन करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. कार्यक्रमाला केंद्र समन्वयक भूपेश चव्हाण, शाळेतील शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका व मदतनीस, पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यलढ्याविषयी विचार मांडण्यासोबतच देशभक्तीपर गीतांवर कवायत, गीते व लघुनाटिका सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. यावेळी नवभारत साक्षरता अभियानांतर्गत उत्तीर्ण झालेल्या नवसाक्षरांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना गोड प्रसादाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि देशभक्तीची प्रेरणा देणारा हा सोहळा उत्साहात पार पडला.

थोडक्यात

## एकात्मता विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा, लेझीम कवायतीने वेधले सर्वांचे लक्ष



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सत्यमेव जयते शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर द्वारा संचालित एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक, पालक व उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीत गायले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण विद्यार्थ्यांनी सादर केलेली लेझीम कवायत ठरली.

पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने केलेल्या लेझीम कवायतीने उपस्थितांची मने जिंकली. तालबद्ध हालचाली, उत्कृष्ट समन्वय आणि जोशपूर्ण सादरीकरणामुळे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या या सुंदर सादरीकरणाचे टाळ्यांच्या कडकडाटात कौतुक केले विद्यार्थ्यांना लेझीम प्रशिक्षण धनश्री ढेगेकर यांनी दिले. यावेळी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि देशाच्या प्रगतीसाठी जबाबदार नागरिक म्हणून योगदान देण्याचे महत्त्व सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक शरद उरकुडे, शुभांगी कातुरे, सुनीता गावडे, सोनल फुंडे यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि लेझीम कवायतीच्या आकर्षक सादरीकरणामुळे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

## विनोद जैस्वाल यांच्या हस्ते गांधी चौक पारशिवनी येथे ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी येथील गांधी स्मारक समीतीतर्फे आयोजित १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्त गणमान्य नागरीकांच्या उपस्थितीत तालुका काँग्रेस कमेटी विनोद जैस्वाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बाजार चौक येथे राष्ट्रगीत गायन करुन स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक, मोर शिवाजी फुलबांधे, दीपक पालीवाल, नानाभाऊ लोहकरे, कोमल चंद राऊत, ज्ञानेश्वर बडवाईक, सुनिता डोंमकी, मधुकर बेले, दीपक शिवरकर, डॉक्टर इरफान अहमद, नाना बावणे, सलीम बाघाडे हेमंत पलिवाल, पिलाजी ढोबळे सह मोठ्या संख्येने गणमान्य नागरिक यावेळी उपस्थित होते .यावेळी विद्यार्थ्यांना निष्ठाण वाटप करण्यात आले.

## तहसिलदार सुरेश वाघचौरे यांच्या हस्ते तहसिल कार्यालय पारशिवनी येथे ध्वजारोहण



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तहसिल कार्यालय परीसरात तहसिलदार सुरेश वाघचौरे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण पार पडले. यावेळी पारशिवनी तहसिल कार्यालयात शहरातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध शासकिय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक गणमान्य नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तहसिलदार यांनी ध्वजारोहण करीत उपस्थित सर्वांना १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत शासनाच्या विविध योजनांची माहीती दिली. यावेळी पोलीस निरीक्षक किशोर शेळकी, नायब तहसीलदार, नगराध्यक्ष सुनिता डोमकी,खंड विकास अधिकारी सुभाष जाधव, सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता,व अन्य विभागाचे अधिकारी शासकिय कार्यालयातील कर्मचारी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्य दिना निमित्त विद्यार्थ्यांना मिष्ठान्न वाटप करण्यात आले.

## मुकुंद कृष्ण शिरोळे यांचे निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सोमवारी १७ ऑगस्ट रोजी दुपारी साडेपाचच्या दरम्यान मुकुंद शिरोळे यांचे वयाच्या ७१ व्या वर्षी हृदयक्रिया बंद पडून किड्स इस्पितळात निधन झाले. ते मृत्युसमयी ७१ वर्षाचे होते. त्यांच्या मागे पत्नी राधिका, मुले केतन, केतकी, बंधू आणि भगिनी तसाच मोठा आप्त परिवार आहे.

## मेट्रो आता वसई-विरारपर्यंत धावणार

**वृत्तसंस्था, मुंबई**

मुंबई महानगरप्रदेशातील वाहतुकीला चालना देण्यासाठी मेट्रो १३ -मिरा भाईंदर ते वसई विरार या प्रकल्पास, तसेच पुणे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महत्वाचा ठरणाऱ्या पुणे रिंगरोडच्या सोरतापवाडी ते वरवे-शिवरे मार्गास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झाली. ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतून जाणा-या मेट्रो १३ -मिरा भाईंदर ते वसई-विरार मार्गाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे.

# दाभा येथे महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा शुभारंभ

### आकांक्षा फाउंडेशनच्या सहकार्याने दाभा परिसरातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी संधी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दाभा परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या नवीन इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा शुभारंभ आज उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. आकांक्षा फाउंडेशनच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या या शाळेचा आज पहिला शैक्षणिक दिवस होता.

शाळेच्या पहिल्याच दिवशी चिमुकले विद्यार्थी आपल्या पालकांसोबत मोठ्या उत्साहाने शाळेत दाखल झाले. नवीन शाळा, नवीन वर्ग, नवीन शिक्षक आणि नव्या शैक्षणिक वातावरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत आपल्या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विशेष समिती सभापती श्रीमती संतोषदेवी लद्धा यांनी उपस्थित राहून विद्यार्थी व पालकांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना मनापासून अभ्यास करण्याचे, शाळेतील प्रत्येक संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेऊन त्यांना सातत्याने प्रोत्साहन द्यावे, असे मार्गदर्शन केले.

दाभा परिसरातील प्रत्येक मुलाला चांगले आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, हा महानगरपालिकेचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. इंग्रजी माध्यमाच्या या नवीन शाळेमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळच उत्तम शिक्षणाची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त, कौशल्यविकास आणि आत्मविश्वास वाढविण्यावरही भर दिला जाईल,असे शिक्षण विशेष समिती सभापती श्रीमती संतोष देवी लद्धा यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी संस्थेचे मुख्य संयोजक सोमसुर्व चॅटर्जी तसेच आकांक्षा फाउंडेशनचे प्राचार्यगण, शिक्षकवृंद आणि संपूर्ण कर्मचारी उपस्थित होते. महानगरपालिका व आकांक्षा फाउंडेशन यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येत आहे. दाभा परिसरातील अनेक पालकांसाठी आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची इच्छा असते. मात्र गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उपलब्धता आणि आर्थिक बाबी यामुळे अनेक वेळा अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू झालेली ही इंग्रजी माध्यमाची शाळा विद्यार्थ्यांसाठी तसेच पालकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्यावर भर दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण करून त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. शाळेच्या पहिल्या दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि पालकांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान हे या नव्या शैक्षणिक उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. दाभा परिसरातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सुरू झालेल्या या नव्या शैक्षणिक प्रवासाला शिक्षण सभापती श्रीमती संतोष देवी लद्धा यांनी सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व शाळेच्या संपूर्ण टीमला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. प्रत्येक मुलाला उत्तम शिक्षण आणि उत्तम भविष्याची संधी मिळावी, हेच

# अखंड भारत संकल्प दिनानिमित्त नागपुरात भव्य बाइक रॅलीचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद, राष्ट्रीय बजरंग दल तसेच माई फाउंडेशन व माई ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने अखंड भारत संकल्प दिनानिमित्त नागपुरात भव्य बाइक व कार रॅलीचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रवीणभाई तोगडिया यांच्या अखंड भारताच्या संकल्पनेला पुढे नेत देशभरात १४ ऑगस्टपासून अखंड भारत संकल्प सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

त्याच अनुषंगाने नागपुरात विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष डॉ. मोतीलाल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली काढण्यात आली. रॅलीचा प्रारंभ मनीषनगर येथील माई ग्रुप कार्यालयासमोर सकाळी १० वाजता भारतमातेच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आला. राष्ट्रगीतानंतर कार्यकर्ते मनीषनगर टी- पॉइंटपर्यंत पायी चालत गेले. यावेळी भारत माता की जय, जय श्रीराम अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यानंतर तिरंगा आणि अखंड भारताचा भगवा ध्वज हातात घेऊन बाइक व कार रॅलीला सुरुवात झाली. देशभक्तीपर गीतांच्या तालावर सहभागी कार्यकर्त्यांनी उत्साहात रॅली काढली. मनीषनगर उड्डाणपूल, विमानतळ चौक, सोमलवाडा चौक, जयप्रकाशनगर, खामला मार्केट, रेडिसन ब्लू चौक, छत्रपती चौक, रहाटे कॉलनी, सीताबर्डी, झिरो माईल मार्गे संविधान चौक येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी रॅलीला संबोधित करताना आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे विदर्भ प्रांत कार्याध्यक्ष डॉ. मोतीलाल चौधरी म्हणाले की, भारताला प्राचीन काळी जंबूद्वीप म्हणून ओळखले जात होते. विविध काळात परकीय आक्रमणांमुळे भारताचे भौगोलिक, सांस्कृतिक, वैचारिक व आर्थिक नुकसान झाले. देशाची अखंडता आणि स्वाभिमान टिकविण्यासाठी सम्राट विक्रमादित्य, महाराणा प्रताप, चक्रवर्ती सम्राट राजाभोज, राणी दुर्गावती, राणी लक्ष्मीबाई, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, शहीद भगतसिंग, वीर सावरकर, राजगुरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी यांच्यासह अनेक महापुरुषांनी संघर्ष केला.

१९४७ मधील भारताची फाळणी हा इतिहासातील अत्यंत वेदनादायी अध्याय आहे. फाळणीच्या काळात लाखो निरपराधांना जीव गमवावा लागला, तर कोट्यवधी नागरिकांना आपली घरे, जमीन आणि मुळापासून विस्थापित व्हावे लागले. या त्रासदीत प्राण गमावलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करून विस्थापित कुटुंबांच्या संघषार्ला व धैर्याला नमन करण्यात आले. भारत पुन्हा कधीही तुटू नये, विखुरला जाऊ नये तसेच देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व अबाधित राहावे, या उद्देशाने अखंड भारताचा संकल्प करण्यात आला आहे. डॉ. प्रवीणभाई तोगडिया यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरात अशा रॅलींचे आयोजन करण्यात येत असल्याचे डॉ. चौधरी यांनी सांगितले. रॅलीत राष्ट्रीय बजरंग दलाचे विदर्भ प्रांत महामंत्री यजेंद्रसिंह ठाकूर, आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद नागपूर महानगर अध्यक्ष मोरेश्वर काकडे, आरबीडी महामंत्री निशिकांत पारधी, माई फाउंडेशनच्या सचिव अड. रूबी चौधरी, प्रकाश बघेले, निलेश बोपचे, श्रीकृष्ण तळेगावकर, जैलाल पटले, श्रीपद दखने, विनायक लांजेवार, राजकुमार पारधी, शिव पारधी, किशोर नागदेव, राहुल क्षीरसागर, रिया, आस्था, रुपेश, मल्हार, हिंगे आदी सहभागी झाले होते. रॅलीच्या यशस्वीतेसाठी माई फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मोतीलाल चौधरी, वैबगंगा ग्रुपचे श्रीहरी चौधरी, अलायन्स ग्रुपचे मोतीलाल पटले, निसर्ग ग्रुपचे निशिकांत पारधी, मातोश्री ग्रुपचे राजू पटले, परिसरातील नागरिक, आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेची टीम, माई ग्रुपची टीम तसेच संपूर्ण स्टाफने विशेष सहकार्य केले.

# श्री गजानन महाराजांची पालखी शेगावकडे रवाना

### 'नागपूरचा राणा माहेरी निघाला, संगे संतमेळा भजनी रंगला' या भक्तिमय जयघोषात नागपुरातून पालखी शेगावकडे रवाना



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री गजानन महाराज सेवा ट्रस्ट, नागपूरच्यावतीने आयोजित श्रींच्या पालखी सोहळ्याचे यंदा २५ वे वर्ष आहे. निज ज्येष्ठ शुद्ध षष्ठी, रविवार दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ६ वाजता श्रीक्षेत्र नागपूर येथून श्री गजानन महाराजांची पालखी श्रीक्षेत्र शेगावकडे पायी वारीसाठी भक्तिमय व मंगलमय वातावरणात रवाना झाली. नागपूरचा राणा माहेरी निघाला, संगे संतमेळा भजनी रंगला, या भक्तिमय जयघोषात हजारो भाविकांनी पालखीला निरोप दिला. ज्ञान, भक्ती आणि सेवाभावाचा संदेश देणारी ही पालखी मार्गातील विविध गावांतून प्रवास करीत श्रीक्षेत्र शेगावकडे मार्गक्रमण करणार आहे. दि.२७ ऑगस्ट रोजी सायंकाळी पालखीचे श्रीक्षेत्र शेगाव येथे आगमन होणार आहे. त्यानंतर दि. २८ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजता श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेऊन राखी अर्पण करण्यात येणार आहे.

त्याच दिवशी पालखी शेगावहून नागपूरकडे परतीच्या प्रवासासाठी प्रस्थान करणार आहे. या पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले असून, संपूर्ण वारीदरम्यान भजन, अभंग आणि श्री गजानन महाराजांच्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## एसआरके स्कूल बसचालक राकेश येडमे यांचे उपचारादरम्यान निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**



नरखेड तालुक्यातील उमठा येथील रहिवासी तथा एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूल, जलालखेडा येथील स्कूल बसचालक राकेश रामकृष्णजी येडमे (वय ४३) यांचे शनिवारी सकाळी ८ वाजता नागपूर येथील मेडिकल कॉलेज व रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच उमठा परिसरासह एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूलच्या विद्यार्थी, पालक व शिक्षकवर्गात हळहळ व्यक्त करण्यात आली.

राकेश येडमे हे एस.आर.के. इंडो पब्लिक स्कूल, जलालखेडा येथे स्कूल बसचालक म्हणून कार्यरत होते. आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे शाळेत ने-आण करण्याची जबाबदारी ते पार पाडत होते. विद्यार्थ्यांशी त्यांचे आपुलकीचे संबंध असल्याने त्यांच्या निधनाने शाळेतील विद्यार्थी व सहकाऱ्यांमध्ये दुःखाचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी दुपारी १ वाजता उमठा येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ तसेच शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, भाऊ असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनामुळे येडमे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, ग्रामस्थांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले.

# प्लास्टिक लॅमिनेटेड कपला ना : कुल्हडच्या वापराचा संकल्प करत बल्लारपूर बिझनेस असोसिएशनतर्फे स्वातंत्र्यदिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर (धनंजय पांढरे )**

बल्लारपूर बिझनेस असोसिएशनच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी ८० वा स्वातंत्र्यदिन महात्मा गांधी संकुल परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहणासोबतच प्लास्टिक लॅमिनेटेड पेपर कपचा वापर टाळून आरोग्यदायी व पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचा संकल्प करण्यात आला. असोसिएशनच्या वतीने दरवर्षी एका नवीन व्यापाऱ्याला ध्वजारोहणाचा मान देण्यात येतो. यावर्षी जनरेशन-झेड युवा व्यापाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे एम. डी. कलेक्शनचे दीपक घरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर असोसिएशनचे अध्यक्ष सादिक जव्हेरी यांनी उपस्थित व्यापारी, ग्राहक व नागरिकांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत व्यापारी म्हणून देशाप्रती असलेली जबाबदारी आणि सामाजिक बांधिलकी याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात प्लास्टिक लॅमिनेटेड पेपर कपच्या वापरामुळे आरोग्यावर होणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यात आली. गरम चहा, कॉफी किंवा अन्य गरम पेये प्लास्टिक लॅमिनेटेड कपमधून घेतल्यास सूक्ष्म प्लास्टिक कण शरीरात जाण्याची शक्यता असल्याची माहिती असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रशांत भोरे यांनी तज्ज्ञांच्या अहवालांच्या आधारे दिली.स्वतःपासून सुरुवात या भूमिकेतून उपस्थित व्यापाऱ्यांनी प्लास्टिक लॅमिनेटेड कपचा वापर न करण्याचा संकल्प केला. यावेळी बल्लू सेठ गिधवानी व अध्यक्ष सादिक जव्हेरी यांच्या हस्ते ज्येष्ठ तसेच युवा व्यापाऱ्यांना मातीचे कुल्हड भेट देण्यात आले. आरोग्य व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकारी अध्यक्ष प्रदीप भास्करवार, सचिव संजय मुपीडवार, डांगे, जगदीश मुंदडा, ज्येष्ठ व्यापारी रामनारायण खंडेलवाल, अमित पाझारे, अरुण वाघमारे, मनोहर चावला, तेजिंदर सिंग दारी, रवींद्र सिंग बवेजा, नरेश मुंदडा, गिरीश गंधेवार, मुरली सेठ मुलाणी, माजिद दिनेश सोनिग्रा, लियाकत अली यांच्यासह समस्त व्यापारी वर्गाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी फुलझले यांनी केले.

# स्फोटकांनी भरलेल्या व्हॅनमधून धूर, अन् खापरखेड्यात काही क्षणांची धडकी

## जवळपास ६ टन स्फोटकांनी भरलेल्या वेकोलीच्या एक्सप्लोसिव्ह व्हॅनमधून धूर, एक्सप्लोसिव्ह व्हॅनचा विमा मे २०२६ मध्येच संपल्याची माहिती, मुख्य बाजारपेठ व औष्णिक वीज केंद्र परिसरात खळबळ, वेकोलीने सुरक्षा नियमांना फासला हरताळ

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा-श्रीकांत जालंधर**

वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड (वेकोली) प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे एबी इनक्लाईन कोळसा खाण परिसरात असलेल्या मेन मॅगझीनमधून जवळपास ६ टन स्फोटक (बारुद) साहित्य घेऊन जाणाऱ्या एका एक्सप्लोसिव्ह व्हॅन क्रमांक MH-40-BG-2089 मधून अचानक धूर निघाल्याने खापरखेडा औष्णिक वीज केंद्र व मुख्य बाजारपेठ परिसरात एकच खळबळ उडाली.




खापरखेडा येथील मुख्य बाजारपेठेतील चिकन मार्केट राष्ट्रीय महामार्ग परिसरात १८ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास सदर घटना असून चिकन विक्रेत्यांनी वेळीच दाखविलेल्या सतर्कतेमुळे एक्सप्लोसिव्ह व्हॅन वेळेवर थांबवून पाण्याचा मारा केल्यामुळे सुदैवाने खूप मोठी दुर्घटना टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर एक्सप्लोसिव्ह व्हॅन एबी इन्कलाईन कोळसा खाण परिसरातील मेन मॅगझीनमधून स्फोटके घेऊन शिंगोरी व भानेगाव कोळसा खाणी कडे जात होती. यावेळी खापरखेडा मुख्य बाजारपेठ चिकन मार्केटसमोर अचानक एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या एका टायरमधून धूर निघत असल्याचे शफीक अन्सारी, अकरम कुरेशी, तौशिफ फजलानी आदी चिकन विक्रेत्याना दिसून आले त्यांनी तात्काळ चालकाला इशारा देऊन वाहन थांबवले पाण्याच्या पाईपने टायरला लागलेली आग विझविली प्रत्यक्षदर्शींने सांगितल्या नुसार टायरच्या घर्षणाने जर आग पकडली असती व ती आग आत असलेल्या स्फोटकांपर्यंत पोहोचली असती तर संपूर्ण परिसर उद्धवस्त झाला असता.

या घटनेनंतर वेकोलीच्या वाहतूक व्यवस्थेचा बुरखा फाटला आहे विशेष म्हणजे, संबंधित एक्सप्लोसिव्ह व्हॅनचा विमा मे २०२६ मध्येच संपला आहे विमा संपलेले व तांत्रिकदृष्ट्या अनफिट असलेले वाहन ३ ते ६ टन स्फोटक द्रव्यांसह (बारुद) रस्त्यावर फिरत कसे होते? मेन मॅगझीन मधून एक्सप्लोसिव्ह व्हॅन निघण्यापूर्वी अनिवार्य असलेली तांत्रिक सुरक्षा तपासणी कागदावरच झाली होती का? असे सवाल आता उपस्थित होत आहेत.

मेन मॅगझीन ते खापरखेडा भानेगाव हा १५ किलोमीटरचा मार्ग चनकापूर, खापरखेडा भानेगाव यांसारख्या दाट वस्त्यांनी वेढलेला आहे. शिवाय या परिसरात दोन मोठी औष्णिक वीज केंद्र आहेत कोळसा खाणीत लाखो टन कोळसा काढण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जवळपास ६ टन स्फोटकांचा (बारुद) जर या मार्गावर स्फोट झाला असता तर जीवित व वित्तहानीची कल्पनाही करने कठीण आहे.

स्फोटक साहित्याच्या वाहतुकीबाबत पेट्रोलियम अँड एक्स्प्लोझिव्ह्ज सेफ्टी ऑर्गनायझेशन च्या कडक नियमावलीचे वेकोली प्रशासनाने सर्रास उल्लंघन केल्याचे दिसते या संपूर्ण प्रकाराची निष्पक्ष चौकशी व्हावी, निष्काळजीपणा करणाऱ्या वेकोलीच्या अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

थोडक्यात

### खापरखेडा येथे नागपंचमीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

नागद्वार यात्रेनंतर नागपंचमीच्या निमित्ताने खापरखेडा येथील वॉर्ड क्रमांक १, चिचोली परिसरातील युवकांच्या वतीने कढाई महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याची भावना जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला परिसरातील नागरिक व भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागपंचमीच्या पारंपरिक उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर कढाईचा महाप्रसाद तयार करून परिसरातील नागरिक व भाविकांना श्रद्धेने वितरित करण्यात आला. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी नागरिकांची मोठी उपस्थिती होती. यावेळी परिसरात भक्तिमय व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

नागद्वार यात्रेनंतर धार्मिक परंपरेनुसार आयोजित करण्यात आलेल्या या महाप्रसादाच्या माध्यमातून युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. धार्मिक कार्यक्रमासोबतच सामाजिक सलोखा व आपुलकीची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. नागरिकांनीही युवकांच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुगत पानतावणे, विक्की बोरकर, शुभम पारडे, लक्की पानतावणे, कार्तिक भौंतकर, राकेश भौंतकर, मनीष मेश्राम, यश तिखे, विक्रांत बोरकर, निखिल निकुरे आणि सम्यक पौनीकर आदींनी परिश्रम घेतले. परिसरातील नागरिकांनी युवकांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

### महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खापरखेडा येथे उत्साहात स्वातंत्र्यदिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

आपला स्वाभिमान असलेला आपला राष्ट्रध्वज फडवतांना माझा उर आनंदाने भरून येतो आहे, आपण सर्वच उंचावर डौलाने फडकणा-या तिरंगाध्वजाप्रमाणे उंच स्वप्न बघूया, या शब्दांसोबत मागील सत्रातील दहावीची गुणवंत विद्यार्थीनी कु.अर्पिता अरविंद ढोरे हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक अरूण वडस्कर, पोलीस सब इन्स्पेक्टर मेश्राम, पत्रकार केशव पानतावणे, सरपंच मिनाक्षी तागडे,शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्ष कविता भोसकर पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, श्यामली चानीकर व बहुसंख्येने गावातील प्रतिष्ठित नागरिक व माजी विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी शाळेतील राष्ट्रीय व राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला तसेच मागील सत्रातील वर्ग दहावी, बारावी व शालेय स्तरावरील विविध विषयातील सर्वोत्कृष्ट विद्याथ्यार्ना भेटवस्तू व नगदी बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने सादर करण्यात आलेले समूहगीत व विविध समूहनृत्याने उपस्थितांच्या मनात देशभक्तीची भावना निर्माण झाली. या कार्यक्रमाचे संचालन कुरूडकर यांनी केले तर नानोटी सरांनी गायलेल्या वंदेमातरम गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या निमित्ताने संस्थेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वितरित करून त्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

### दिव्यांगांसाठी मार्गदर्शन मेळावा



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा यांच्यावतीने समुदाय आधारित दिव्यांग पुनर्वसन प्रकल्पांतर्गत येथील नगरपंचायत सभागृहात दिव्यांग मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या विविध योजना, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी तसेच आर्थिक सक्षमीकरणाबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मेळाव्यात मुख्याधिकारी पार्थ सिडाम, स्वच्छता निरीक्षक राजू तांबेकर यांच्यासह दिव्यांग व्यक्ती व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. संस्थेचे वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक मनोज मेश्राम व जिल्हा समन्वयक प्रितम नानवटे यांनी दिव्यांग प्रमाणपत्र, शासकीय योजना, कौशल्य विकास, बचत गट व स्वयंरोजगाराबाबत माहिती दिली. दिव्यांग व्यक्तींनी आपल्या हक्कांबाबत जागरूक राहून पात्र शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे यांनी यावेळी केले. यावेळी दिव्यांग व्यक्तींनी विविध अडचणी मांडल्या. कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार धम्ममाला टेटू यांनी मानले.

### गोपालकृष्ण पुरोहित यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



रेशीमबाग येथील रहिवासी विश्वब्राम्हण पांचाळ समाजातील ज्येष्ठ नागरिक आणि महाराष्ट्र राज्य वखार महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचारी गोपालकृष्ण प्रभाकरराव पुरोहित यांचे सोमवारी ८० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गंगाबाई घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्यामागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे तसेच बराच मोठा आप्त परिवार आहे.

## प्रेस क्लबमध्ये पत्रकारांचा वार्षिक मेळावा साजरा




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वातंत्र्यदिनी नागपूरच्या पत्रकार क्लबमध्ये पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांचा वार्षिक मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम टिळक पत्रकार भवन ट्रस्ट (टीपीबीटी) ने नागपूर युनियन ऑफ वर्किंग जर्नालिस्ट्स (एनयूडब्ल्यूजे), पत्रकार क्लब ऑफ नागपूर (पीसीएन) आणि नागपूर डिजिटल पत्रकार संघ (एनडीपीएस) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता. 'सृजन' या संगीत समूहाने अजरामर आणि समकालीन गाण्यांच्या सुरावटीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. शशिकांत, चारुदत्त, पवन, स्नेहल, स्वाती, श्रेयस, विकास आणि नितीन यांसारख्या गायक आणि संगीतकारांनी आपल्या भावपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांना खिळवून ठेवले.

भारतीय लष्कराच्या उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात उप-क्षेत्राचे उप-महाव्यवस्थापक, ब्रिगेडियर अभिजित वलिंबे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाला उपस्थिती लावली, तर आमदार मोहन माटे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल पुरस्कार विजेत्या पत्रकारांना स्मृतिचिन्हे देऊन सन्मानित केले. सन्मानित व्यक्तींमध्ये महेश उपदेव (सामना), नरेश डोंगरे (लोकमत), श्यामकांत जहागीरदार (तरुण भारत, दिल्ली), टिकाराम साहू 'आझाद' (दैनिक भास्कर) आणि ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर दुपारे व भूपेंद्र गणवीर यांचा समावेश होता.

पत्रकारांच्या गुणवंत मुलांचाही रोख पारितोषिके आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. पुरस्कार विजेत्यांमध्ये देवांग बिपेंद्र सिंग, किरीट कार्तिक लोखंडे, मेधांश मिलिंद महाजन, आशी अमित वर्मा, गार्गी कुंटे, अनघ राघवेंद्र तिवारी, कार्तिकी महेश शिंपी, जान्हवी नटवरलाल अबोती, उर्वशी जितेंद्र सोनकांबळे, कल्याणी देवराव प्रधान आणि पलक सत्येंद्र भारद्वाज यांचा समावेश होता.

उपस्थितांना संबोधित करताना, महाराष्ट्र युनियन ऑफ वर्किंग जर्नालिस्ट्स, टिळक पत्रकार भवन ट्रस्ट आणि पत्रकार क्लब ऑफ नागपूरचे अध्यक्ष प्रदीप कुमार मैत्रा म्हणाले की, हा वार्षिक मेळावा गेल्या २६ वर्षांपासून सातत्याने आयोजित केला जात आहे. त्यांनी पुढे घोषणा केली की, टीपीबीटी रहमान यांच्या स्मरणार्थ दरवर्षी एका नामवंत पत्रकाराला सन्मानित करण्यासाठी 'जीवन गौरव पुरस्कार' सुरू करेल. प्रभाकर मारपकवार. शिरीष बोरकर, सरचिटणीस, टीपीबीटी यांच्या उपस्थितीतही कार्यक्रमाची शोभा वाढली.

ब्रम्हाशंकर त्रिपाठी, अध्यक्ष, आणि महासचिव, अनुपम सोनी, सरचिटणीस, ठवहख; ज्येष्ठ संपादक एस. एन. विनोद; प्रभाकर दुपारे; जोसेफ राव; विश्वास इंदूरकर; विवेक पुराडभट, महेश उपदेव; ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत जोशी; रामू भागवत; छायाचित्र-पत्रकार रणजित देशमुख आणि सनी शेंडे; आणि पदाधिकारी विजय ठाकूर (अध्यक्ष), मुकेश हेडाऊ (सरचिटणीस), आणि प्रकाश रंगारी (खजिनदार), इतरांची उपस्थिती होती.

### अमली पदार्थमुक्त विद्यार्थी घडविण्यासाठी पारशिवनी पोलिसांचा अभिनव उपक्रम

#### शाळा, कॉन्व्हेंट व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी घेतली अमली पदार्थविरोधी शपथ



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांपासून दूर ठेवण्यासाठी आणि अमली पदार्थमुक्त समाजाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने पोलीस स्टेशन पारशिवणी यांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. पोलीस स्टेशन पारशिवणीच्या हद्दीतील विविध शाळा, कॉन्व्हेंट व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी अमली पदार्थविरोधी शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांचे सेवन करणार नाही, तसेच आपल्या मित्र-मैत्रिणींना व समाजातील इतर व्यक्तींनाही अमली पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती करू, असा संकल्प केला.

या उपक्रमासाठी पोलीस स्टेशन पारशिवणीच्या वतीने सर्व शैक्षणिक संस्थांना आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला शाळा, शिक्षक, विद्यार्थी तसेच पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात तिरंगा ध्वज, राष्ट्रभक्ती आणि देशप्रेमासोबतच 'अमली पदार्थांना नकार - उज्ज्वल भविष्याला होकार' हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. या सामाजिक उपक्रमाला गटविकास अधिकारी सुभाष जाधव तसेच गटशिक्षणाधिकारी कोडापे यांनी विशेष सहकार्य व योगदान दिले. शिक्षण विभाग आणि पोलीस विभाग यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांविरोधात जागरूकता निर्माण करण्याचा हा उपक्रम प्रभावी ठरला. पोलीस निरीक्षक पारशिवनी किशोर शेरकी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे स्थानिक नागरिक, पालक, शिक्षक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक असून, अमली पदार्थमुक्त पारशिवनीसाठी पोलीस आणि नागरिकांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# प्रहार मिल्ट्री स्कूलमध्ये 'राखी अर्पण' कार्यक्रम

## सैनिकांना राख्यांमधून विद्यार्थ्यांचे प्रेम अर्पण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सीपी अँड बेरार अंतर्गत येणाऱ्या प्रहार मिल्ट्री स्कूल, रवी नगर येथे राखी अर्पण कार्यक्रम अत्यंत उत्साहात, देशभक्तीने भारलेल्या आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. देशाच्या सीमांवर सजग असलेल्या वीर जवानांना प्रेम, आदर आणि कृतज्ञतेचा संदेश देत विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्यांचे अर्पण केले.



या अनोख्या उपक्रमाने रक्षाबंधनाच्या सणाला एक राष्ट्रीय आणि संवेदनशील परिमाण प्राप्त करून दिले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट कर्नल सुजित बैस, शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट अशोक बनसोड, ब्रिगेडियर सुनील गावपांडे तसेच शाळेच्या प्राचार्या वंदना कुलकर्णी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात भारत माता पूजन आणि अमर जवान स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीतांचे मनोवेधक सादरीकरण केले, ज्यामुळे संपूर्ण सभागृहात राष्ट्रप्रेमाचा जाज्वल्य संचार झाला. प्रहार मिल्ट्री स्कूल, रवीनगर यांच्यासह एकूण ४० शाळांमधून संकलित झालेल्या तब्बल दोन लाख राख्यांचे औपचारिक सुपूर्दग्रहण करण्यात आले. या राख्या सीमेवर तैनात जवानांना पाठवण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहुण्यांना राखी बांधून आपले प्रेम आणि सन्मान व्यक्त केला.

या भावस्पर्शी सोहळ्याला सी. पी. अँड बेरार सोसायटीअंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांचे प्राचार्य, शिक्षकगण तसेच ज्या शाळांनी राख्या पाठवल्या त्या सर्व शाळेतील प्राचार्य आणि शिक्षक यांची उपस्थिती लाभली.

यावेळी लेफ्टनंट कर्नल सुजित बैस यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले, "आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांनी आपल्या सशस्त्र दलांप्रती असलेली आत्मीयता आणि आदरभाव पाहून आम्हा सर्वांना अभिमान वाटतो. 'राखी' ही केवळ नाती जपणारी नाही, तर शौर्य, समर्पण आणि एकतेचे प्रतीक ठरू शकते, हे या उपक्रमाने अधोरेखित केले आहे." त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांच्यात देशसेवा आणि समाजभान जपण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या सांगता प्रसंगी मुख्याध्यापिका वंदना कुलकर्णी यांनी सर्व मान्यवरांचे आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ देशभक्ती नाही, तर सैनिकांच्या त्यागाविषयी जाणीव निर्माण झाली आहे. ही राखी त्यांच्या भावना पोहोचवणारे अमूल्य माध्यम ठरेल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका मृणाल काटे यांनी केले. समारोप वंदे मातरम गीताने करण्यात आला, ज्याने उपस्थित सर्वांच्या मनामध्ये अभिमान, आदर आणि देशसेवेची प्रेरणा जागवली. शाळेच्या संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे कौतुक करत सांगितले की "राखी अर्पण" हा एक उपक्रम नसून, तो विद्यार्थ्यांच्या मनामध्ये देशासाठी समर्पणाची ज्योत प्रज्वलित करणारा, संवेदनशीलता, ऐक्य आणि राष्ट्रीयत्वाचा सजीव अनुभव ठरला.

थोडक्यात

## शालेय साहित्याच्या भेटीने ठाकरवाडी शाळेतील विद्यार्थी आनंदले




**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

जय गणेश व्यासपीठ, पुणे यांच्यातर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, शैक्षणिक साहित्याची भेट मिळाल्याने त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. या वेळी साईनाथ मित्र मंडळ ट्रस्टचे प्रमुख पियुष शहा, भवानी पेठेतील श्री शिवाजी मित्र मंडळाचे प्रल्हाद भाऊ थोरात, येरवडा येथील नवज्योत मित्र मंडळाचे अमित जाधव, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका मनीषा बुंदे, सहशिक्षिका देवश्री रेपाळ, नंदा ठाकर आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना वह्या, चित्रकलेची वही, शाळेची बॅग, पाण्याची बाटली, पेन्सिल, खोडरबर, शॉपनर, रंगपेटी, फुलपट्टी आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्ट जाणवत होता. नवीन वही हातात घेताना, रंगपेटी आणि पेन्सिल पाहताना तसेच शाळेची बॅग आणि पाण्याची बाटली हाताळताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला निरागस आनंद उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. काही विद्यार्थ्यांनी मिळालेले साहित्य मित्रांना दाखवत आनंद व्यक्त केला.

## समर्थ रामदास शाळेत स्वातंत्र्य दिन



**दै. सिंहवाणी वृत्त, काचुरवाही - शुभम कामळे**

समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, समर्थ रामदास प्राथमिक विद्यामंदिर आणि समर्थ रामदास पब्लिक स्कूल, अरोली यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थासचिव नंदाताई घटे होत्या. संस्थाध्यक्ष शिवाजीराव कुंभलकर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्था उपाध्यक्ष तथा प्राचार्य अनिकेत कुंभलकर, ठाणेदार स्नेहल राऊत, प्राचार्य सुनिल बडवाईक, मुख्याध्यापक सुनिल डडमल, पर्यवेक्षक केशव डोकरीमारे, कविता आंबटकर, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष विलास दुधे, रजत कुंभलकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नितीन उईके, संजय पुरी, विनेश फुलेकर, गणेश भलावीर, प्रशांत बालपांडे, संजय बावने, प्रवीण मोहनकर, शैलेश डहारे, महेश लिचडे, नारायण वंजारी, अश्विन कुंभलकर, उषा कौरती, प्रीती भुजाडे, भाग्यश्री श्रावणकर, पायल जांभुळकर, धनश्री उरकुडकर, प्रा. किरण धुर्वे , प्रियंका बावनगडे, उषा मनगटे, जयश्री धुर्वे, लता मेश्राम,आकांक भा्य तांबुलकरश्री तहेकर, सुनिता सोनारे, रजनी हटवार, निशा जांभुळकर, दीक्षा मनगटे, प्रा. नेहा गभणे, निकिता हूड, सुरेश रामटेके, मंगेश मोहनकर, आदी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

## इंदुताई मेमोरियल हायस्कूल व लॉर्ड लेडी कॉन्व्हेंटमध्ये स्वातंत्र्यदिन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इंदुताई मेमोरियल हायस्कूल व लॉर्ड लेडी कॉन्व्हेंटमध्ये स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साह पूर्ण शिस्तबद्ध व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, भाषणे व देशभक्तीपर गीतांवर कवायती सादर केल्या. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान व राष्ट्राप्रती कर्तव्य भावनांचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमात द यंग रेव्होल्युशन पँथर शिक्षण संस्था चे सचिव डॉ. सच्चिदानंद फुलेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगून देशाची एकता व अखंडता जपणे संविधानाचा आदर करणे आणि जबाबदार नागरिक म्हणून आपली कर्तव्य पार पाडणे तसेच विद्यार्थ्यांनो शिक्षणाची कास धरा असा संदेश दिला.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष विद्याताई फुलेकर अध्यक्ष म्हणून लाभल्या तर बळवंतजी डोंगरे, दिनेशजी ठाकूर, वषार्ताई श्यामकुळे तसेच प्रभाग क्रमांक २ चे नगरसेविका डोंगरे मॅडम व लोणारे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन कु. रेणू शंभरकर यांनी केले तर मान्यवरांचे आभार विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनीलकुमार रीनाईत यांनी मानले व वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# विदर्भात स्टार्टअप उभारण्यासाठी पोषक वातावरण : बी. प्रभाकरन

### 'मंथन4युवा'मध्ये स्टार्टअप कॉन्क्लेव्हचे थाटात उद्घाटन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

तरुण उद्योजकांनी कम्फर्ट झोनच्या बाहेर पडून शहरी भागांपलीकडील संधींचा शोध घ्यावा, तसेच स्टार्टअप्स टिकाऊ आणि विस्तारक्षम करण्यावर भर द्यावा, असे आवाहन लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे एमडी आणि सीईओ बी. प्रभाकरन यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या युवा-केंद्रित, तंत्रज्ञानाभिमुख आणि भविष्यदर्शी दृष्टिकोनातून प्रेरित 'मंथन4युवा' अभियानांतर्गत विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे सोमवारी स्टार्टअप कॉन्क्लेव्ह, पेटंट गॅलरी आणि विज्ञान प्रदर्शनाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. स्टार्टअप कॉन्क्लेव्हमध्ये १२०० तर पेटेंट गॅलरी व विज्ञान प्रदर्शनात १४८२ विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

व्हीएनआयटीच्या मल्टी-ॲक्टिव्हिटी कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या कार्यक्रमाला कार्यक्रमाला आमदार संजय भेंडे, लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे एमडी आणि सीईओ बी. प्रभाकरन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह अतुल मोघे, हॅपीइटर्स डॉट एआयचे कोफाउंडर शशिकांत चौधरी, एंजल इन्व्हेस्टर सुमित लखानी, व्हीएनआयटीचे संचालक प्रेमलाल पटेल, डॉ. उमेश देशपांडे, अभिजीत खंडागळे, रोहित अग्रवाल, संयोजक विष्णू चांगदे, रितेश गवांडे, क्षितिज इंगळे यांची उपस्थिती होती.

उत्पादन, कृषी, सेवा, लॉजिस्टिक्स तसेच महत्त्वपूर्ण खनिज क्षेत्रात विदर्भात मोठी क्षमता असल्याचे सांगत प्रभाकरन यांनी भारतीय प्रतिभा देशातच टिकवून विदर्भाच्या विकासासाठी तिचा उपयोग करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. तुमच्यापैकी फक्त १०० जणांनीही विदर्भ घडवण्याचा निर्धार केला तर भारत सर्वोत्तम देश बनू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार संजय भेंडे यांनी महाराष्ट्रामध्ये देशाच्या विकासाचे प्रमुख इंजिन बनण्याची क्षमता असल्याचे सांगितले तर शशिकांत चौधरी यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे बुद्धिमत्तेचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होत असल्याचे सांगितले. एआयमुळे स्टार्टअप परिसंस्थेत आमूलाग्र बदल होणार असून लहान टीम किंवा एकल उद्योजकांनाही जागतिक स्तरावर मोठ्या संधी असल्याचे ते म्हणाले. अतुल मोघे यांनी जागतिक विचार करा आणि स्थानिक कृती करा, असे आवाहन केले.

या अभियानाच्या संचालन समितीत डॉ. राजेश गादेवार, डॉ. देवेंद्र भोंगाडे, डॉ. अभय मुद्गल, केतन मोहितकर, डॉ. संजय ढोबळे, डॉ. सोमदत्त करंजीकर, विनय चावला, प्रकाश शुक्ला, निधी बावशे, डॉ. सचिन हजारे, डॉ. प्रदीप बिबटे, विनोद कडू, डॉ. राजेश ढोबळे, डॉ. विजय दातारकर, वैभव बावनकर, डॉ. सुमित सिंह, डॉ. राजेश देवकाते, डॉ. गजानन पोलनवार यांच्यासह अन्य मान्यवरांचा समावेश आहे.

## तुमच्या कल्पनांना जागतिक स्तरावर घेऊन जा : अमृता फडणवीस

### हॅकाथॉन व आयडियाथॉनमध्ये ७७६५ विद्यार्थ्यांचा सहभाग

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** अपयशाला घाबरू नका. आपल्या कल्पनांवर विश्वास ठेवून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा आणि आपल्या कल्पनांना जागतिक स्तरावर घेऊन जा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या व गायिका अमृता फडणवीस यांनी तरुणांना केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या युवा-केंद्रित दृष्टिकोनातून आयोजित मंथन4युवा अभियानांतर्गत विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे आयोजित हॅकाथॉन व आयडियाथॉनच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी पेटेंट गॅलरी, विज्ञान प्रदर्शन आणि विविध उपक्रमांना भेट दिली व विद्यार्थ्यांच्या नवकल्पना आणि सादरीकरणाचे कौतुक केले. हॅकाथॉन व आयडियाथॉनमध्ये ७७६५ विद्यार्थ्यांचा सहभाग राहिला.



कार्यक्रमाला आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, एम्सचे संचालक डॉ. प्रशांत जोशी, व्हीएनआयटीचे संचालक प्रेमलाल पटेल, डॉ. विपीन इटनकर, डीसीपी सायबर डॉ. उमेश देशपांडे, संयोजक विष्णू चांगदे व रितेश गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. आजच्या तरुणांमध्ये सर्जनशीलता, प्रतिभा, बुद्धिमत्ता आणि कल्पनाशक्ती मोठ्या प्रमाणात आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून तुम्हाला तुमची गुणवत्ता, कल्पना आणि कौशल्य जगासमोर मांडण्याची संधी मिळत आहे. भारतातील सर्वोत्तम कल्पना भविष्यात जागतिक स्तरावर पोहोचतील, असे त्या म्हणाल्या.

## परदेश अभ्यास दौऱ्यासाठी शेतकऱ्यांकडून अर्ज आमंत्रित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** राज्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशातील विकसीत आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, तसेच शेतमालाची निर्यात/कृषी मालाचे पणन व बाजारपेठेतील मागणी, कृषीमाल प्रक्रिया, त्या देशांमध्ये उपयोगात येत असलेले अद्ययावत तंत्रज्ञान अवगत करून त्याचा वापर राज्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतावर उपयोग करण्यासाठी हा दौरा उपयुक्त आहे. याचबरोबर त्या देशातील शेतकऱ्याशी प्रत्यक्ष चर्चा करून तसेच क्षेत्रीय भेटी, संबंधित संस्थाना भेटी आदीद्वारे शेतकऱ्याचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरीता हा दौरा महत्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. त्यासाठी कृषी विभागामार्फत राज्यातील शेतकऱ्याचे देशाबाहेर अभ्यास दौरे सन २०२६-२७ ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अभ्यास दौऱ्याकरीता युरोप व चीन देशांची निवड करण्यात आली आहे.

नागपूर जिल्ह्याकरीता एक महिला, एक केंद्र/राज्य कृषी पुरस्कार प्राप्त पिकस्पर्धा विजेता शेतकरी, इतर तीन शेतकरी असे एकूण ५ शेतकऱ्यांचा देशाबाहेरील अभ्यास दौऱ्याकरीता निवड करण्यात येणार आहे. परदेश अभ्यास दौऱ्याकरीता इच्छुक शेतकऱ्यांनी आपला प्रस्ताव २१ ऑगस्टपर्यंत तालुका कृषी अधिकारी कार्यालयास सादर करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

## विश्वब्राह्मण (पंचाळ) जेष्ठ नागरिक मंडळातर्फे गुणवंत विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व प्रतिभावंतांचा सत्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विश्वब्राह्मण (पंचाळ) ज्येष्ठ नागरिक मंडळ, नागपूरचा २० वा, वर्धापनदिन नुकताच जीवनबोध मठ, इतवारी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यानिमित्त समाजातील विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक व प्रतिभावंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांना शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. प्रतिभावंतांचाही सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते तसेच शिवसेनेचे शहर अध्यक्ष सिद्धु उर्फ सिद्धेश्वरराव कोमजवार यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक वाटचालीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक महामंडळ (विदर्भ), नागपूरचे अध्यक्ष अँड. अविनाशजी तेलंग यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, निवारा तसेच आरोग्य या विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक दिनकरराव उल्लेवार, उपाध्यक्ष चंद्रशेखर खुरसवार, सचिव राजेंद्र चोपावार, सहसचिव रत्नाकरराव यमनुरवार, कोषाध्यक्ष दिनाकरराव मधुपवार तसेच कार्यकारिणी सदस्य अशोकराव कासलावार, विनायकराव आमगांवकर, सुभाष श्रीपादवार, अशोकराव इत्तडवार आदींनी सहकार्य केले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि ज्येष्ठ नागरिकांचा झालेला सन्मान हा त्यांच्या कार्याची दखल घेणारा तसेच समाजातील इतरांसाठी प्रेरणादायी ठरला.

# एचआयव्ही/एड्स क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल सह्याद्री संस्थेच्या लिंक वर्कर प्रकल्पाला पुरस्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, जनजागृती तसेच बाधित व्यक्तींना आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सह्याद्री संस्था, लिंक वर्कर प्रकल्प, नागपूर यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. निवृत्ती राठोड, सिव्हिल सर्जन, नागपूर आरोग्य विभाग यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. एचआयव्ही संसगार्बाबत जनजागृती करणे, जोखमीच्या गटांपर्यंत पोहोचून प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देणे, एचआयव्ही तपासणी व उपचारासाठी मार्गदर्शन करणे तसेच गरजू व्यक्तींना आरोग्यसेवांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य लिंक वर्कर प्रकल्पाच्या माध्यमातून सातत्याने केले जात आहे. समाजातील विविध घटकांमध्ये एचआयव्ही/एड्सविषयी असलेले गैरसमज दूर करून प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रकल्पातील कार्यकर्ते सातत्याने कार्यरत आहेत.



त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत सह्याद्री संस्थेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे सह्याद्री संस्था, लिंक वर्कर प्रकल्पातील कर्मचारी व कार्यकर्त्यांमध्ये नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, एचआयव्ही / एड्समुक्त समाजाच्या निर्मितीसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल सह्याद्री संस्थेचे पदाधिकारी, प्रकल्पातील कर्मचारी, लिंक वर्कर्स तसेच सर्व सहकाऱ्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# आश्लेषा नक्षत्रही कोरडे! सोयाबीनच्या शेंगा भरण्यापूर्वीच पावसाची टांगती तलवार

### कुठे शेंगा उतरण्यास सुरुवात, तर कुठे सोयाबीन फुलोऱ्यात; दमदार पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यात पावसाने पुन्हा एकदा हुलकावणी दिल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. आकाशात ढगांची गर्दी होत असली तरी पावसाच्या दमदार सरी बरसत नसल्याने आश्लेषा नक्षत्रही कोरडेच जात आहे. शेतातील पिके बहरलेली असून आता त्यांना पाण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे वरुणराजाच्या आगमनाकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.



३ ऑगस्ट रोजी हत्ती वाहन घेऊन आश्लेषा नक्षत्राला सुरुवात झाली. नक्षत्र सुरू झाल्यापासून अनेकदा आकाश ढगाळ झाले; मात्र पावसाने मात्र हुलकावणी दिली. आज ना उद्या पाऊस येईल, या आशेवर शेतकऱ्यांनी निंदणी, डवरणी, रासायनिक खतांचा वापर तसेच पिकांच्या निगा राखण्यासाठी मोठा खर्च केला. मात्र पाऊस लांबत चालल्याने आता केलेला खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

तालुक्यातील अनेक शेतांमध्ये सोयाबीनचे पीक सध्या महत्त्वाच्या अवस्थेत पोहोचले आहे. काही ठिकाणी सोयाबीनला शेंगा उतरण्यास सुरुवात झाली असून, काही शेतांमध्ये अद्याप सोयाबीन फुलोऱ्यात असल्याचे चित्र दिसून येत आहे. पिकांच्या या निर्णायक अवस्थेत जमिनीत पुरेसा ओलावा असणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः शेंगा भरण्याच्या काळात पाऊस न झाल्यास दाण्यांची भर कमी होऊन उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

सोयाबीनबरोबरच तूर आणि कपाशीची पिकेही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. कपाशीच्या पिकासाठी शेतकऱ्यांनी बियाणे, खते, औषध फवारणी व मशागतीवर मोठा खर्च केला आहे. पावसाने आणखी दडी मारल्यास या पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

यंदाच्या पावसाळ्यात मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य आदी नक्षत्रांमध्येही अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नाही. आश्लेषा नक्षत्रात पिकांना पावसाची सर्वाधिक गरज असताना हे नक्षत्रही कोरडे जात असल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.

आश्लेषा नक्षत्र १६ ऑगस्ट रोजी संपणार असून, १७ ऑगस्टपासून मोर वाहन घेऊन मघा नक्षत्राला सुरुवात होणार आहे. त्यामुळे आता मघा नक्षत्राकडून शेतकऱ्यांना मोठ्या अपेक्षा आहेत. पिके सध्या हिरवीगार दिसत असली तरी पुढील काही दिवस पाऊस न झाल्यास जमिनीतील ओलावा कमी होऊन पिकांना ताण बसण्याची शक्यता आहे.

सोयाबीनचे पीक सध्या फुलोऱ्यापासून शेंगा भरण्याच्या अवस्थेत असल्याने पुढील आठवडा शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. दमदार पाऊस झाला तर पिकांना नवसंजीवनी मिळेल; मात्र पावसाने आणखी दडी मारल्यास सोयाबीन, तूर व कपाशीच्या उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून आता केवळ ढगांची गर्दी नव्हे, तर पिकांना आधार देणाऱ्या दमदार पावसाची प्रतीक्षा केली जात आहे.

# अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल साई अकॅडमीची इमारत सील

## मनपाद्वारे झोन निहाय नोटीस कारवाईला सुरुवात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेने शहरातील अग्निसुरक्षा उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कठोर पावले उचलली असून, महापौर निता ठाकरे यांच्या निदेर्शानुसार अग्निशमन व आणीबाणी विभागामार्फत मंगळवार (ता. १८) रोजी कारवाई करण्यात आली. यात अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल मे. साई अकॅडमीची इमारत सीलबंद करण्यात आली आहे. तसेच मनपाच्या दहाही झोन निहाय नोटीस कारवाई करण्यात येत आहे.

मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके यांच्या नेतृत्वात पथकाने अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर तपासणी व कारवाईची मोहीम राबविली. या कारवाईदरम्यान सुगत नगर अग्निशमन केंद्राच्या पथकाने आदर्श कॉलनी, जरीपटका पोलीस स्टेशनजवळील मे. साई अकॅडमी ट्युशन क्लासेसची पाहणी केली. पाहणीमध्ये इमारतीत आवश्यक अग्निसुरक्षा उपाययोजनांचे पालन करत नसल्याचे तसेच जागेचा अनधिकृत वापर होत असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील कलम ८(३) अन्वये मनपाच्या अग्निशमन व आणीबाणी विभागाने कायदेशीर कारवाई करत सदर इमारत सीलबंद केली.

या इमारतीत भूतळापासून तिसऱ्या मजल्यापर्यंत वर्गखोल्यांसाठी वापर करण्यात येत होता. तसेच टेरेसवर टिनशेड उभारून त्याचाही वापर ट्युशन क्लासेससाठी केला जात असल्याचे आढळले. आवश्यक अग्निसुरक्षा उपाययोजनांशिवाय वापर होत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता होती. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी विभागाकडून शहरातील शैक्षणिक संस्था, व्यावसायिक आस्थापना व इतर सार्वजनिक वापराच्या इमारतींमध्ये अग्निसुरक्षा नियमांचे पालन होत आहे किंवा नाही, याची तपासणी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे. अग्निसुरक्षा नियमांचे पालन करून नागरिक व विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

नरेंद्र नगर अग्निशमन केंद्र तर्फे मानेवाडा - बेसा रोड येथील विठ्ठल कृपा रेडीमेड शॉप, महाराष्ट्र एम्पोरियम, महालक्ष्मी सेलिब्रेशन हॉल ला नोटीस देण्यात आली. आशीनगर झोनमधील वैशालीनगर बिनाकी येथील सुपर केम केमिकल, शुभम केमिकल्स, मे. गणेश स्वीट, मौजा नारी येथील मे. जगत सेलिब्रेशन हॉल, कमाल चौकातील मे. के. जी. एन बिग बाजारक व सुगतनगरातील मे. राज ट्रेडर्स, गुरुनानकपुरा भागातील मे. रजा बिग बाजार, कमाल चौकातील मे. हिरा स्वीट, इंदोरा भागातील मे. हॉटेल अरेबियन ताजला ना हरकत प्रमाणपत्र न घेतल्याबद्दल नोटीस बजावण्यात आली आहे.

**धरमपेठ झोन अंतर्गत अनधिकृत बांधकामा विरुद्ध नोटीस प्रक्रीया सुरू**

नागपूर महानगरपालिकेच्या धरमपेठ झोन अंतर्गत विविध प्रभागांमध्ये तपासणी आज दिनांक



१८ ऑगस्ट रोजी नोटीसीद्वारे संबंधित संस्थांकडून बांधकामाची मंजूर परवानगी, नकाशे, बांधकामासंबंधीची आवश्यक अभिलेख सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या त्या अधिकृत आहे किंवा अनधिकृत आहे, याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

सदर कारवाईमध्ये अग्निशमन विभाग, एनडीएस व अतिक्रमण विभाग तसेच धरमपेठ झोनचे उपअभियंता व सहाय्यक आयुक्त यांचा समवेत ही कारवाइ महापौर व आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेली असून, संबंधित संस्थांनी नोटीसीमध्ये नमूद केलेल्या कालावधीत आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

तपासणीदरम्यान बांधकाम अनधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कायदे व नियमांनुसार नोटीस, बांधकाम थांबविणे, अनधिकृत बांधकाम हटविणे/पाडणे तसेच आवश्यकतेनुसार इतर वैधानिक कार्यवाही करण्यात येईल. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच शहरातील बांधकामांमध्ये कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेची ही कारवाई पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे.

**कार्यवाही करण्यात नोटीस बजावण्यात आलेल्या संस्थांची नावे खालील प्रमाणे आहे.**

१. श्री. प्रमोद खापरीकर, माहेश्वरी, पंचायत भवन

२. श्री. विनोद जशनानी, इलेक्ट्रॉनीक व्यवसाय,

३. श्री. अनिल बेलिया, राजस्थानी महिला मंडळ,

नागपूर : मा. महापौर, नागपूर महानगरपालिका यांच्या दिनांक ०६/०८/२०२६ रोजीच्या सभेत दिलेल्या निर्देशानुसार,नागपूर शहरात अनधिकृत बांधकामांवर आळा घालण्या करीता शहरातील विविध इमारती व बांधकाम येथील अनधिकृत बांधकाम करण्याऱ्या मालमत्ताधारकांना त्यांचे हक्क व मालकी हक्क स्पष्ट करणारे कागदपत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संदर्भानुसार खालील नमूद ठिकाणी असलेल्या मालमत्ताधारकांनी आपले मालकी हक्काबाबतचे अधिकृत कागदपत्र संबंधित विभागाकडे त्वरित सादर करावेतः

**कागदपत्रे सादर.करावयाच्या इमारती व ठिकाणेः**

१. सैफी प्रोप्रायटर, के.डी.के. कॉलेज रोड, नागपूर.

२. मे. एज्युकेअर कोचिंग क्लासेस, युक्ती अपार्टमेंट व माऊली कृपा इमारत, स्वामी गजानन हायस्कूल समोर, खरबी रोड, नागपूर.

३. मे. हॅपीनेस सेलिब्रेशन हॉल व लॉन, श्री हरिश्चंद्र तुळशीराम रागंगधारे, सूरज टाऊनशिप, वाठोडा चौक ते पारडी रोड, वाठोडा, नागपूर.

मनपा प्रशासनाकडून संबंधित सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त निदेर्शानुसार विहित वेळेत आवश्यक ती कागदपत्रे सादर करून सहकार्य करावे.

---

**थोडक्यात**

## अस्थिका समाजाचा १९ वा दीपोत्सव सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

त्रिमूर्ती नगरातील अस्थिका समाजाच्या वतीने आयोजित १९ वा, दीपोत्सव सोहळा, श्री भगवती सभागृहात तीन दिवस भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या आनंदाने नुकताच संपन्न झाला. विदभार्तील विविध भागांतून तसेच विविध समाजघटकांतून आलेल्या हजारों भाविकांनी या सोहळ्यात सहभाग नोंदविला होता. सर्वप्रथम गणपती पूजन व घटस्थापनेने सोहळ्याचा शुभारंभ झाला. चेन्नई येथील युवा प्रवचनकार कु. आध्या वेंकटेश यांनी संकीर्तन प्रवचनातून भाविकांना मंत्रमुग्ध केले. आदिपुरम दिनानिमित्त गणपती पूजन, कन्या पूजन व कुमारी पूजनानंतर वैदिक संशोधन केंद्रातील विद्यार्थ्यांनी गुरुजी प्रवीण लिगडे यांच्या मार्गदर्शनाखाली वेदपारायण सादर केले. सुहासिनींची भव्य दीपपूजा पार पडल्यानंतर या धार्मिक विधीत समाजातील महिला सहभागी झाल्या होत्या.

श्रीनगर येथील अहिगिरी नंदिनी महिला समूहाने महिषासुर मर्दिनी या गीतावर आधारित आकर्षक सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. तीनही दिवस परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवी भवानी व देवी अंडाळ यांचे दर्शन घेतले. दीपपूजेसाठी नोंदणी केलेल्या सर्व सुहासिनींसाठी अस्थिका समाजाच्या व्यवस्थापन समितीने आवश्यक व्यवस्था केली होती. सर्व धार्मिक विधी नियोजित वेळेत सुरळीतपणे पार पडला. सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अस्थिका समाजाच्या व्यवस्थापन समितीने अथक परिश्रम घेतलेत. देवी अंडाळ व देवी भवानी यांच्या मंगला आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. या सांस्कृतिक कार्यक्रमात राजू तलमले यांची उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमात शेवटच्या दिवशी अतिथी पाहुण्यांचा सत्कार सुद्धा करण्यात आला. त्यापैकी एक विशेष अतिथी पाहुणे देवरावजी प्रधान व त्यांच्या प्रतिभा प्रधान यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. हे विशेषः समाजाचे मनमिळावू सचिव, के.व्ही. नागराजन यांनी सर्व भाविकांचे आभार मानले.

## ग्रामपंचायत कार्यालय धानोली येथे स्वातंत्र्य दिन सोहळा थाटात



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

ग्राम पंचायत कार्यालय धानोली येथे १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण चे कार्यक्रम सरपंच अमोल नरोले यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपसरपंच अमित तिल्लिखेडे, ग्रामपंचायत सदस्यगण, ग्रामकर्मचारी,आरोग्य कर्मचारी, रोजगार सेवक, अंगणवाडी, शिक्षकवृंद, विद्यार्थीवृंद आणि समस्थ गावकरी यांच्या उपस्थितीत स्वातंत्र्यदिन सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.

## कर्ज माफितील जाचक अटी रद्द करा!

### उपविभागीय अधिकारी काटोल यांना शेतकरी संघर्ष कृति समिती काटोलचे निवेदन सादर




**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकतेच उपविभागीय अधिकारी काटोल यांना शेतकरी संघर्ष कृति समिती काटोल (बं. स) जि. नागपूर, महा. राज्या तर्फे निवेदन देण्यात आले. मागण्या खालीलप्रमाणे कर्ज माफिच्या अटी, शर्ती कमी करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्जमाफिचा लाभ मिळावा. २) शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा शासनस्तरावर वेळेच्या आतं करावा ३)बोगस बियाण्यावर सरकारने कठोर कारवाई करावी ४) २०२५चे पिकविमा धारकांना पैसे त्वरित मिळावे ५)वहीवांटीकरिता पीडित शेतकऱ्याचे रस्त्याचे प्रश्न त्वरित निकाली काढावे ६)प्राणघातक व पिकांचे नुसकान होणाऱ्या जगंलीजनावरापासून शेतकऱ्यांना सरक्षण, मदत मिळावी व इतर मुद्दावर निवेदन देण्यात आले.

यावेळी अध्यक्ष बाबाराव वाघमारे, सचिव प्रफुल्ल जोशी, उपाध्यक्ष प्रा. उपप्राचार्य रमेश येवले, कोष्याध्यक्ष सुभाषजी नोरोलीये, सहसचिव हरिष मानकर, रामराव पाटील, सुवर्णा पवार, नगरसेविका लताताई कडू, अन्न पुरवठा सदस्या सुनीता काळे, डॉ. सुधाकर कावळे, पुष्पा सावरकर, वनिता पाटील, यमुना मुरोडिया, प्रविणा खोब्रागडे रिधोरा शाखा अध्यक्ष विलास पोहकर व इतर चर्चा व निवेदन देण्यात आले. मागण्या जर मजूर झाल्या नाही तर आंदोलनाचा सुद्धा यावेळी इशारा देण्यात आला. मोठ्या संख्येने महिला शक्ती व शेतकरी बांधवाची उपस्थिती निवेदन देतेवेळी होती.

---

## बाभूळवाड्यात नागपंचमीनिमित्त भाविकांची गर्दी, नागठाण्याच्या दर्शनासाठी विदर्भातून भाविक

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

विदर्भातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील बाभूळवाडा येथील नागठाणा देवस्थानात सोमवार १७ ऑगस्ट रोजी नागपंचमीनिमित्त सकाळ पासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

पारशिवनी ते पेंच रोडवर वसलेल्या या प्राचीन देवस्थानाला नागपंचमीच्या दिवशी विशेष महत्त्व आहे. त्यामुळे महाराष्ट्राबरोबरच शेजारील मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यातूनही भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळपासूनच मंदिर परिसरात "नागबाबा की जय" च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते.



**पौराणिक महत्त्व आणि आख्यायिका**

नागठाणा देवस्थानाला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार पूर्वी दुंडाखैरी आणि बाभूळवाडा शिवारात गवळी समाजाची वस्ती होती. गावखेड्यात जाऊन दही-दूध विकणे हा त्यांचा व्यवसाय होता. एकदा गवळी समाजातील एक सून दही विकून घरी आली असता मडके खूप जड वाटले. सासूच्या मदतीने मडके खाली उतरवून पाहिले असता त्यात प्रत्यक्ष "शेषनाग" विराजमान झालेला दिसला. त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न करूनही तो बाहेर निघाला नाही.

अखेर मडक्याभोवती लाकडे रचून आग लावण्यात आली. त्यानंतर नाग बाहेर पडून पळू लागला. पळताना तो ज्या दगडांवरून गेला त्या दगडांवर आजही शेषनागाच्या विविध आकाराचे पट्टे स्पष्ट दिसतात. हीच आख्यायिका असल्याने तेव्हापासून श्रावण महिन्यातील नागपंचमीला येथे मोठी महापुजा यात्रा भरवली जाते.पर्यटन स्थळ पाहून भाविक आनंदात दिसून आले.

**धार्मिक कार्यक्रम आणि प्रशासनाची व्यवस्था**

या परिसरात नागमंदिरासह हनुमान मंदिर आणि चित्रछाया मंदिर,नंदी मंदिर देखील आहे.यानिमित्ताने सकाळी भजन कार्यक्रम आयोजित केले होते. भाविकांनी सर्व देवतांचे व साक्षांत जिवंत नागोबाचे दर्शन घेऊन पूजा-अर्चा केली. दुपारी ३ वाजता महाआरतीचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात पार पडला. यावेळी भाविकांसाठी काही भाविकांनी पुलाव तर स्थानिक नवयुवक मंडळी कडून चन्याची उसळ,आणि प्रसादाची व्यवस्था केली होती.यानिमित्ताने परिसरात पुजा साहित्य यासह विविध दुकाने,झुले व खेळ साहित्य सजलेले होते.नेहमीपेक्षा मोठी गर्दी लक्षात घेऊन शांतता आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

भक्त "भुजंगराव ढोरे" यांनी सांगितले की, यावर्षी भाविकांची संख्या मागील वर्षांच्या तुलनेत अधिक होती. निसर्गरम्य परिसर आणि धार्मिक श्रद्धेमुळे या यात्रेला दरवर्षी भाविकांसह पर्यटकांचीही गर्दी वाढत आहे.आणि जर राजकीय इच्छाशक्ती वाढली तर या तिर्थक्षेत्रासाठी मोठी निधी उपलब्ध होवून मोठा बदल अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले.

## इलाईट पब्लिक स्कूल चाचेर येथे स्वातंत्र्य दिन





**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

इलाईट पब्लिक स्कूल चाचेर येथे रक्षा बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राष्ट्रपाल गजभिये यांच्या मार्गदर्शनात स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी दुर्गाप्रेम संस्थेचे सचिव गुप्तपाल गजभिये यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त मुलांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे देवेंद्र पानतावणे व संस्थेचे इतर पदाधिकारी लखन वाघमारे ,अमोल रामटेके, मिथुन पौनीकर उपस्थित होते. प्रास्ताविक शिक्षिका शबनम छवारे यांनी केले .आभार प्रदर्शन शिक्षिका नेहा पाल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पब्लिक स्कूलचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद भारती नारनवरे, आचल वाणी, निकिता कावरे, संतोषी बरबटे यांनी परिश्रम घेतले.

---

# जाम नदीच्या पुलावर कठडे नसल्याने जीव मुठीत!

### जलालखेडा-उमठा मार्गावरील पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर, भाजप शहराध्यक्ष जगदीश बारमासे यांचे आमदार चरणसिंग ठाकूर यांना निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील जलालखेडा-उमठा मार्गावरील जाम नदीच्या पुलावर अद्याप कठडे (रेलिंग) बसविण्यात आले नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पुलावरून दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक व वाहनांची ये-जा होत असतानाही पुलाच्या दोन्ही बाजूंना संरक्षण कठडे नसल्याने अपघाताचा धोका कायम आहे.



संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी पुलावर तातडीने मजबूत कठडे बसविण्यात यावेत, अशी मागणी जलालखेडा येथील भारतीय जनता पक्षाचे शहर अध्यक्ष जगदीश बारमासे यांनी आमदार चरणसिंग ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जलालखेडा हे परिसरातील प्रमुख बाजारपेठेचे ठिकाण असल्याने पेठमुक्तापूर, उमठा, खडकी, दातेवाडी, वडविहिरा, मेंढला, वाढोणा, सिंजर, रामठी यासह अनेक गावांतील नागरिक दररोज विविध कामांसाठी जलालखेड्यात येत असतात. किराणा व जीवनावश्यक वस्तूंची खरेदी, शासकीय कामे तसेच इतर सुविधांसाठी नागरिकांची मोठी वर्दळ असते.

जलालखेडा येथे नायब तहसीलदार कार्यालय, पोलीस स्टेशन यासह विविध महत्त्वाची कार्यालये व सेवा उपलब्ध असल्याने या मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. त्यामुळे जाम नदीवरील हा पूल परिसरातील अनेक गावांसाठी दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

पावसाळ्यात जाम नदीच्या पाण्याची पातळी वाढल्यास पुलावरील धोका आणखी वाढतो. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रकाशाची कमतरता, पावसामुळे घसरडा रस्ता आणि पुलाच्या कडेला सुरक्षा व्यवस्था नसल्याने वाहनावरील नियंत्रण सुटल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

**दुर्घटना घडण्यापूर्वी कठडे बसविणे गरजेचे**

जगदीश बारमासे म्हणाले, जलालखेडा-उमठा मार्गावरील जाम नदीचा पूल हा परिसरातील अनेक गावांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. दररोज असंख्य नागरिक या पुलावरून ये-जा करतात. मात्र पुलावर अद्याप कठडे नसल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात नदीला पाणी वाढल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच प्रशासनाने खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पुलावर मजबूत कठडे तसेच आवश्यक सुरक्षा व्यवस्था तातडीने करण्यात यावी, यासाठी आमदार चरणसिंग ठाकूर यांच्याकडे निवेदन दिले आहे.

जाम नदीच्या पुलावर कठडे बसविण्याबरोबरच आवश्यक ठिकाणी रिफ्लेक्टर, सुरक्षाविषयक फलक आणि रात्रीच्या वेळी दृश्यमानता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

आमदार चरणसिंग ठाकूर यांनी या मागणीची दखल घेऊन संबंधित विभागाला तातडीने सूचना द्याव्यात आणि पुलाच्या सुरक्षेचा प्रश्न मार्गी लावावा, अशी अपेक्षा जलालखेडा व परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पुलाला मजबूत कठडे बसविल्यास भविष्यातील संभाव्य अपघातांना आळा बसून हजारो नागरिकांना सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

थोडक्यात

## उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**दै.सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयामार्फत सन २०२५-२६ करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार तसेच डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येणार आहेत. इच्छुक ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह २५ सप्टेंबरपर्यंत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे तीन प्रतीत पाठवावेत, असे आवाहन ग्रंथालय संचालनालयाचे प्र. संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

या पुरस्कारांचा उद्देश शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास घडवून आणणे, जनतेला अधिकाधिक ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करून देणे व वाचनसंस्कृती वृद्धिंगत करणे हा आहे. शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, ड वर्गातील उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख, ७५ हजार, ५० हजार व २० हजार रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट प्रदान करण्यात येईल. राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथसेवक यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे. राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रदीर्घकाळ सेवा देणाऱ्या कार्यकर्त्यांना व सेवकांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येईल.

## समाजभूषण पुरस्काराने प्रा. नितेश मोटघरे सन्मानित




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

शैक्षणिक आणि ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत सामाजिक बांधिलकी जपणारे जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय, उमरेड येथील प्रा. नितेश मोटघरे यांना समाजभूषण पुरस्कार २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. बुद्धिष्ट नेटवर्क, नवी मुंबई यांच्या वतीने त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. उमरेड येथे आयोजित विशेष कार्यक्रमात बाळ गंगाधर टिळक बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूरचे कोषाध्यक्ष दिलीपभाऊ मामुलकर सर यांच्या हस्ते प्रा. मोटघरे यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. या सन्मानामुळे उमरेडच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या कार्याचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे. यावेळी मंचावर जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक शहाणे, संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजू के. माटे, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अनिल शिंदे, एकदंत फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. शंभरकर सर तसेच संस्थेचे सहकार्यवाह केशव बाबूलकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासोबतच वाचन संस्कृती, ग्रंथालय चळवळ आणि सामाजिक जाणीव वृद्धिंगत करण्यासाठी प्रा. नितेश मोटघरे सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या योगदानाला मिळालेला समाजभूषण पुरस्कार हा त्यांच्या कायार्चा गौरव तर आहेच, शिवाय शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन डॉ. अजय मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. प्रल्हाद धोटे, डॉ. बळीराम राऊत, डॉ. प्रशांत जांभुळे, डॉ. प्रमोद पौणिकर, प्रा. राम भांगे, प्रा. प्रशांत नारायणे आणि प्रा. सिद्धांत नाईक यांनी परिश्रम घेतले. शिक्षण, वाचन आणि समाजसेवेच्या वाटचालीला मिळालेला हा सन्मान प्रा. नितेश मोटघरे यांच्या कार्याची नवी ओळख ठरला आहे.

## गणेशोत्सव मंडळांनी २० ऑगस्टपासून करावी नोंदणी

### खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने संस्कार भारतीच्या सहकार्याने यंदादेखील गणेशोत्सवादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून त्यासाठी इच्छूक गणेशोत्सव मंडळांनी नोंदणी २० ऑगस्टपासून दररोज दुपारी १२ ते ३ या वेळेत नितीन गडकरी यांचे जनसंपर्क कार्यालय, महाल, नागपूर येथे नोंदणी करायची आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून कला, साहित्य, संस्कृती आणि परंपरांचा प्रचार-प्रसार व्हावा तसेच गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध गणेश मंडळांना सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. या उपक्रमांतर्गत भक्तिसंगीत, सुगम संगीत, देशभक्तिपर गीते, हास्य कविसंमेलन, जागरण, गोंधळ, कीर्तन, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, एकपात्री प्रयोग, नाट्यप्रयोग, नकला, गीत रामायण, जादूचे प्रयोग, रांगोळी प्रशिक्षण वर्ग, मेंदी प्रशिक्षण वर्ग, कथाकथन आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करता येणार आहे. गणेशोत्सव मंडळांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत नोंदणी सुरू राहणार असून ज्या संस्थांना कार्यक्रम सादर करायचे त्यांनी ५ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपली नावे नोंदवावी, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समिती, नागपूरचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, डॉ. दीपक खिरवडकर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर,गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले, भोलानाथ सहारे, ॲड. नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे, संजय बंगाले, अतुल गुरू, योगेश बन, राजू कनाटे यांचे सहकार्य लाभत आहे.

# २०० अवैध बांधकामांना मनपाची नोटीस

## अवैध बांधकाम व अतिक्रमणाच्या विरोधात मनपाची धडक कारवाई, महापौर निता ठाकरे यांच्या नेतृत्वात कारवाईचा आढावा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



शहरातील अवैध बांधकाम व अतिक्रमण हटविण्यासाठी मनपाने धडक कारवाई सुरु केली आहे. शहरातील दहाही झोनमधील २०० बेकायदेशीर बांधकामांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. यात मॉल, हॉस्पिटल व सेलिब्रेशन हॉलचा समावेश आहे. महापौरांनी बेकायदेशीर बांधकामावर नाराजी जाहीर करीत तत्काळ सर्व अवैध बांधकामांवर कडक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. शहरातील बेकायदेशीर बांधकामे हटविण्यासाठी महापौर निता ठाकरे यांच्या निर्देशानुसार, शहरात धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. या कारवाईच्या संदर्भात महापौर निता ठाकरे यांनी आज (ता. १८) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीच्या सभापती अश्विनी जिचकार, अग्निशमन व आपात्कालिन सेवा समितीच्या सभापती रुपाली ठाकूर, मुख्य अभियंता लिना उपाध्ये, उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त निर्भय जैन, उपायुक्त अशोक गराटे, उपायुक्त गणेश राठोड, अधीक्षक अभियंता विजय गुरूबक्षानी, नगररचना विभागाचे सहायक संचालक ऋतुराज जाधव, कार्यकारी अभियंता अनिल गेडाम, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह सर्व झोनचे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

**अवैध बांधकाम करणार्यांवर वचक पाहिजे - महापौर**

शहराचे रुप पालटण्यासाठी बेकायदेशीर बांधकाम तसचे रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची आवश्यकता असल्याचे महापौर ठाकरे यांनी सांगितले. केवळ थातूरमातूर कारवाई करून चालणार नाही तर शहरात बेकायदेशीर बांधकाम करणार्यांवर वचक बसला पाहिजे, अशी कारवाई लोकांना दिसली पाहिजे. यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास तसे प्रस्ताव सहाय्यक आयुक्तांनी द्यावे, अशी सूचना त्यांनी दिल्या. झोन कार्यालयांनी नगररचना विभाग, पोलीस, अग्निशमन दल, अतिक्रमण हटाव विभागाच्या कर्मचार्यांना सोबत घेऊन संयुक्तपणे कारवाई केल्यास अधिक परिणामकारक होईल. अतिक्रमण विभागात मनुष्यबळ वाढविण्याची आवश्यकता असल्याचे महापौरांनी यावेळी सांगितले.

**नागरी पोलीस भरती विचाराधीन**

शहरातील अतिक्रमण व बेकायदेशीर बांधकाम हटविण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असून यासाठी मनपाने नागरी पोलीसांची (सिव्हील पोलीस) भरती तसेच प्रतिनियुक्तीवर तहसीलदारांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने तयार करावा. यासंदर्भात राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल, अशी सूचना महापौर ठाकरे यांनी यावेळी केली. अनेक ठिकाणी नारळ पाणी विकणारे रस्त्यावर दिसतात. तुकडोजी पुतळा परिसरातील सर्व अतिक्रमणे हटविण्याचे निर्देश यावेळी महापौर निता ठाकरे यांनी दिले. अवैधपणे गोदाम बांधकाम करणार्यांनी सर्व नियमांचे उल्लंघन केले आहे. अनेक ठिकाणी पायाभूत सुविधांवर परिणाम झाला आहे. बांधकामाचे कोणतेही नियम न पाळता हे बांधकाम झाले आहे. अनेक ठिकाणी मोठे खांब उभे केल्याने नुकसान होत आहे. या बांधकामांना नव्या डीपीआरमध्ये व्यावसायिक क्षेत्र म्हणून मंजुरी देऊ नये, अशी सूचना महापौर यांनी प्रशासनाला केली.

त्याचप्रमाणे अवैध बांधकाम तसेच अतिक्रमण हटावची कारवाई करताना सर्व विभागांनी समन्वयाने कारवाई करावी. या कारवाईचे छायाचित्रे काढावे, अशी सूचना त्यांनी केली. अनेक विभाग विकास कामे करण्यासाठी १०० मीटर सिमेंटचे रस्ते फोडण्यासाठी परवानगी घेतात परंतु प्रत्यक्षात हजार मीटर रस्ता फोडतात, असे निदर्शनास आल्याचे नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी सांगितले.

## दीड महिन्यापासून फरार तीन आरोपी रेल्वे परिसरातून जेरबंद

## वाडी पोलिसांची कारवाई, वर्धा रेल्वे पोलिसांच्या मदतीने अटक

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

वाडी पोलीस ठाण्यात दाखल गंभीर गुन्ह्यातील गेल्या दीड महिन्यापासून फरार असलेल्या तीन आरोपींना वाडी पोलिसांच्या तपास पथकाने वर्धा शहरातील रेल्वे परिसरातून अटक केली. प्रदीप गंगाधर रंगारी (५२), आकाश उल्हास नारनवरे (३८) आणि रवि लक्ष्मण कटरे (४०), अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

१२ जुलै २०२६ रोजी रात्री आंबेडकर बाजाराजवळ ही घटना घडली होती. फियार्दीला आरोपी कुणाल सातपुते याने व्हॉट्सअप कॉल करून बोलावले. त्यानंतर फियार्दी आपल्या आपाची गाडी घेऊन गेला असता आरोपींनी पूर्ववैमनस्यातून त्याला लाकडी काठीने मारहाण केली. तसेच आरोपी प्रदीप रंगारी याने तलवारीसारख्या शस्त्राने वार करून गंभीर दुखापत केली व जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीच्या तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी वाडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाले होते.

वाडी पोलिसांचे तपास पथक आरोपींच्या मागावर होते. तांत्रिक माहिती तसेच गुप्त माहितीच्या आधारे आरोपी वर्धा शहर व परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वर्धा रेल्वे पोलिसांच्या मदतीने रेल्वे परिसरात सापळा रचून तिन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

ही कारवाई पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, सहपोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक १ ऋषिकेश रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन मगर, सहायक पोलीस निरीक्षक कुणाल धुरट, पोलीस हवालदार रोशन फुकट, राहुल बोटरे, सोमेश्वर वर्धे, पोलीस अंमलदार विनोद कुंभलकर, स्वप्नील कारंडे व अश्विन चौधरी यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## थकबाकीदार मालमत्ता करधारकांचे बँक खाती गोठवण्यासह टीव्ही, फ्रीज जप्त करणार

### २० ऑगस्ट ते ३० सप्टेंबरदरम्यान मनपाची विशेष वसुली मोहीम, वसुलीसाठी ४०० कर्मचारी मैदानात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



शहरातील थकबाकीदार मालमत्ता करधारकांविरुद्ध नागपूर महानगरपालिकेने कठोर पवित्रा घेतला आहे. व्यावसायिक आस्थापनांचे बँक खाते गोठवणे तसेच नळ आणि सीवर जोडणी खंडित करण्याचे थेट निर्देश मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले आहेत. तसेच मागील काही वर्षांपासून जवळपास २ हजार ४०० कोटी मालमत्ता कर थकीत आहे. त्यापैकी कमीत कमी १ हजार कोटी ची वसुली करण्याचे उदिष्ट ठेवून कार्य करण्याचे निर्देश आयुक्त डॉ.विपीन यांनी दिले. तसेच थकीत करवसुलीसाठी येत्या २० ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत विशेष वसुली मोहीम राबवण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मंगळवारी(ता.१८) सदर येथील जिल्हा नियोजन भवनात मनपा कर संग्रहकांची विशेष आढावा बैठक पार पडली. बैठकीत मनपाचे अतिरिक्त आयुक्त मुरुगनंथम एम., मिलिंद मेश्राम यांच्यासह दहाही झोनचे सहायक आयुक्त, कर संग्रहक व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत आयुक्त डॉ. विपीन यांनी प्रत्येक झोन कार्यालयाने थकीत करवसुलीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, तसेच पूर्णतः व्यावसायिक, संमिश्र वापर, अनिवासी तसेच मोकळ्या भूखंडांवरील थकबाकी वसुलीस प्राधान्य दिले जाईल. यासाठी नियम ४२ अन्वये वॉरंट बजावून थेट घर मालकाच्या मालकीचे टीव्ही, फ्रीज व स्थावर मालमत्ता जप्त करण्यात यावी, सेवा व शुल्क विभागामार्फत संबंधित व्यावसायिक आस्थापनांचे बँक खाते क्रमांक मिळवून खाती गोठवण्याची कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात यावी, घनकचरा व्यवस्थापन व जलप्रदाय विभागाच्या सहकार्याने संबंधित इमारतींची सीवर लाईन व नळ जोडणी तात्काळ खंडित केली जावी, ५ लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या ७०३ मालमत्ता, तर १ ते ५ लाखांपर्यंत थकबाकी असलेल्या ३,९२४ मालमत्तांवर विशेष लक्ष केंद्रित केले जावे, थकबाकीदारांना जागेवरच कर भरता यावा यासाठी पथकांकडे पीओएस मशिन्स उपलब्ध असतील. या विशेष मोहिमेसाठी कर विभागासह इतर विभागांतील ४०० हून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, दर आठवड्याला मोहिमेचा प्रत्यक्ष आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नागरिकांना आवाहन आहे की, कोणत्याही प्रकारची शास्ती माफ होणार नाही, त्यामुळे कोणत्याही भ्रमात न राहता थकीत मालमत्ता कर यथाशिघ्र मनपा निधीत जमा करावा.

## नागपूर जिल्ह्यात ६८.८७ टक्के मतदारांचे गणना प्रपत्र जमा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर जिल्ह्यातील एकूण ४६,३८,५८९ मतदारांपैकी ३१,९४,५७३ मतदारांचे (६८.८७ टक्के) गणना प्रपत्र स्वाक्षरी करून प्राप्त झाले आहेत. याची डिजिटायझेशनची प्रक्रिया पूर्ण झाली असून सुमारे १४ लाख ४४ हजार १५ मतदारांचे (३१.१३ टक्के) गणना प्रपत्र जमा झाले नाहीत. गणना प्रपत्र जमा न झालेल्या १४ लाख ४४ हजार १५ मतदारांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गृहभेट दिल्यानंतर सापडू न शकलेले किंवा गैरहजर असे ५ लाख ४६ हजार १४९ (११.७७ टक्के), कायमस्वरूपी स्थलांतरित ५ लाख ३० हजार(११.४३ टक्के), मृत २ लाख ४० हजार ३०५ (५.१८ टक्के), दुबार नोंदणी झालेले १ लाख १८ हजार १२ (२.५४ टक्के) आणि इतर ९ हजार ४९१ (०.२० टक्के) मतदारांचा समावेश आहे. यातील मृत व दुबार वगळता इतर मतदारांना दिनांक २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या कालावधीत आपली बाजू संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे मांडता येईल.

प्रारूप मतदार यादी २४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे. प्रत्येक मतदाराने स्वतःचे नाव त्या यादीत तपासून घ्यावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. ज्या मतदारांचे नाव या यादीत समाविष्ट नसेल त्यांना नवीन मतदार नोंदणी करिता फॉर्म ६ व आवश्यक कागदपत्रे पुराव्यासह २४ ऑगस्ट २०२६ पासून जमा करता येतील. कोणताही पात्र मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यापासून वंचित राहणार नाही असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारांच्या घरोघरी भेटी देऊन गणना प्रपत्र भरून घेण्याची मुदत १७ ऑगस्ट, २०२६ पर्यंत होती. सदर काम पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील ४६,३८,५८९ (१०० टक्के) मतदारांबाबत पडताळणी पूर्ण करून नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

# सक्करदरा तलाव सौंदर्यीकरणासह परिसराच्या सर्वांगीण विकासावर भर द्या!

### महापौर निता ठाकरे यांनी केली परिसराची पाहणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सक्करदरा तलावाचे सौंदर्यीकरण तसेच परिसराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महापौर निता ठाकरे व आमदार श्री. मोहन मते यांनी संयुक्तपणे परिसराची पाहणी केली. यावेळी तलाव परिसरातील उपलब्ध सुविधा, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, उद्यान विकास तसेच नागरिकांसाठी आवश्यक सोयी-सुविधांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी सक्करदरा तलावाच्या सौंदर्यीकरणासह परिसराच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले.

मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी प्रशासनाच्यावतीने सुरू असलेल्या उपाययोजना व प्रस्तावित विकासकामांची माहिती दिली. यावेळी विरोधी पक्षनेता संजय महाकाळकर, नगरसेवक रितेश पांडे, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, सहायक आयुक्त विकास रायबोले, कार्यकारी अभियंता राजेश दुफारे, कार्यकारी अभियंता राजेंद्र राठोड यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान सक्करदरा व नेहरू नगर झोन परिसरातील स्वच्छतेचाही आढावा घेण्यात आला. महापौर निता ठाकरे यांनी नेहरूनगर झोनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसह उद्यान विभागाला परिसरातील स्वच्छता आणि नागरिकांचे आरोग्य यांना सर्वोच्च प्राधान्य देत नियमित व विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले.



परिसरातील उद्याने, रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता प्रभावीपणे राखण्यावरही त्यांनी भर दिला. तसेच सक्करदरा तलाव परिसरातील विद्युत व्यवस्था अधिक सक्षम करण्यासह परिसराचे आकर्षक व नियोजनबद्ध सौंदर्यीकरण करण्यासंदर्भात संबंधित विभागीय अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. तलाव परिसराचा विकास करताना नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवणे आणि पर्यटन व मनोरंजनाच्या दृष्टीने त्याचा विकास करण्याबाबतही यावेळी विचारविनिमय करण्यात आला.

थोडक्यात

## "ज्येष्ठ नागरिक फॅशन शो : सेकंड इनिंग" २० रोजी

### ओसरी प्रॉडक्शन्सतर्फे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ओसरी प्रॉडक्शन्सच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी एक आगळावेगळा "ज्येष्ठ नागरिक फॅशन शो - सेकंड इनिंग" आयोजित करण्यात आला आहे. २१ ऑगस्ट रोजी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन असून त्यानिमित्ताने पूर्वसंध्येला म्हणजे २० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. साई सभागृह, शंकरनगर चौक येथे होणाऱ्या या फॅशन शोचे उद्घाटन स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी-वखरे यांच्या हस्ते होणार असून विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, माजी आमदार संदीप जोशी, ज्येष्ठ नेते जयप्रकाश गुप्ता, अजय संचेती व सेंट्रल जैलचे अधिक्षक वैभव आगे यांची उपहस्थती राहील.

या फॅशन शोमध्ये रेट्रो, फंकी आणि पारंपरिक अशा तीन फेऱ्या होणार आहेत. याशिवाय, स्पर्धकांकडून नृत्य, अभिनय आदी कलांचे सादरीकरणही केले जाईल. मनिषा बावनकर व विजय जथे हे या शोचे कोरिओग्राफर आहेत. विजेत्यांना स्मीता टुर्स मुंबईचे जयंत गोरे व रोटरी क्लब एलिटच्या अध्यक्ष स्वप्ना नायर यांच्या हस्ते बक्षिसे वितरीत करण्यात येतील. ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंद, आत्मविश्वास आणि उत्साहाचे रंग भरावेत, त्यांना समाजाच्या केंद्रस्थानी आणावे आणि त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण साजरा व्हावा, या उद्देशाने या अनोख्या फॅशन शोचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ओसरी प्रॉडक्शन्सचे प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी सांगितले.

## यशोधन फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण कार्यक्रम

### वाढदिवसाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश; वृक्षांच्या संगोपनाचा संकल्प



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

यशोधन फाउंडेशनचे संस्थापक राकेश धनराज नौकरकर यांच्या वाढदिवसानिमित्त स्थानिक लेक सिटी ले-आऊट येथील नवनिर्मित उद्यानात यशोधन फाउंडेशनच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी नगरसेवक सतीश चौधरी, यशोधन फाउंडेशनच्या संयोजिका निधी नौकरकर, हार्दिक नौकरकर, सुनील लांजेवार, अमित लाडेकर, विशाल सावरकर, ईशांत ब्रम्हे, रामेश्वर सोनटक्के, भूपेश घुमडे, बालाजी मुंगले, यश वाघमारे, विलास ठाकरे यांच्यासह फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. वृक्षारोपणासोबतच लावण्यात आलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. वाढदिवसाचा आनंद सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमातून साजरा करण्याचा फाउंडेशनचा हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कुणाल मुळे, क्रिश वाघमारे, किरण लाडेकर, बाळकृष्ण वाघमारे यांच्यासह फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

## अनिसचे गौरव आळने यांचा जन्मदिवस नशामुक्त संकल्प दिवस म्हणून साजरा





**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी -मिलींद गाडेकर**

अंधश्रद्ध, निर्मूलन समिती महाराष्ट्र तर्फे सतत ६वर्षापासून महाराष्ट्रातील विविध शाळेतील विद्यार्थीवर्गांना/कॉलेज मधील तरुणांनी नशामुक्त व्हावे, त्यांला नाही म्हणायला शिका असे प्रतिपादन अनिसचे नागपूर जिल्हा कार्यवाह गौरव आलने यांनी त्यांच्या आज जन्मदिवसाचे औचित्य साधून विद्यामंदिर हायस्कूल कोराडी कॉलनी येथे केले.

या प्रसंगी मंचावर विद्यामंदिर स्कूलचे उपमुख्याध्यापक हिंमत डोईफोडे यांनी गौरव आळने यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा पुष्पगुच्छ देऊन दिल्या. मागील एप्रिल महिन्यात शाळेत चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या त्यात विशेष प्राविण्याने पास विद्यार्थ्यांना पदक आणि व्यसनमुक्तीपर महामानवांचे विचार पुस्तिका भेट देण्यात आली निर्व्यसनी आणि सशक्त समाज निर्माण करण्यासाठी व्यसनमुक्तीवर प्रबोधन पर कार्यक्रम शाळेत घेऊ दिल्याबद्दल गौरव आळने यांनी उपमुख्याध्यापकांचे आभार मानले आणि त्यांना जिल्हापरिषद समाज कल्याणविभागतर्फे स्मृतिचिन्ह देऊन त्याना गौरवांकित केले. याप्रसंगी कोराडी अनिस शाखा अध्यक्ष ताराचंद पखिड्डे,मुख्याध्यापक रवींद्र भस्मे, हिंमत डोईफोडे, शिक्षिका स्मिता नव्हाळे, महिला संगीता आळने, उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक बबन गायकवाड महादुला शहर शाखाध्यक्ष यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन विनित मेश्राम सर यांनी केले तर आभार शिक्षिका कु. विभा मने यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वंश मेश्राम, संकेत चौधरी, वंश मेश्राम, आम्रपाली, रागिणी गोंडाने, संकेत गोंडाने, ठमके मॅडम यांनी प्रयत्न केले.

# 'वनार्टी'चे धनगर विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण

### यूपीएससी, एमपीएससीसह लष्कर भरती परीक्षांच्या अर्ज प्रक्रिया सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास व बहुजन कल्याण विभागा अंतर्गत कार्यरत वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) द्वारे धनगर प्रवर्गातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षणाचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय व लष्करी सेवेत प्रवेश करू इच्छिणाऱ्या धनगर प्रवर्गातील विद्यार्थी या उपक्रमाद्वारे योग्य दिशा आणि दर्जेदार मार्गदर्शन मिळण्यास मदत होणार आहे, अशी माहिती 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक मा. प्रशांत वावगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

या सर्वसमावेशक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत केंद्रीय लोकसेवा आयोगाची (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) राज्यसेवा व इतर स्पर्धा परीक्षा, तसेच भारतीय लष्करातील विविध पदांसाठी होणाऱ्या सैनिक भरती परीक्षांच्या पूर्वतयारीचे सखोल धडे दिले जाणार आहेत. स्पर्धा परीक्षांमधील वाढती स्पर्धा लक्षात घेता, धनगर प्रवर्गातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना शासकीय सेवेच्या मुख्य प्रवाहात आणणे हा या प्रशिक्षण योजनेचा प्रमुख उद्देश आहे. प्रशिक्षणासाठी अर्ज प्रक्रिया १० ऑगस्ट २०२६ पासून सुरू झाली असून ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २३ ऑगस्ट २०२६ ठेवण्यात आली आहे. पात्र उमेदवारांनी वेळेत अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रशिक्षणासाठी लागणारी वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज भरण्याची संपूर्ण पद्धत 'वनार्टी'च्या अधिकृत संकेतस्थळावर सविस्तर उपलब्ध करून देण्यात आली आहे. धनगर प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा पुरेपूर लाभ घेऊन स्पर्धा परीक्षेच्या तयारीला नवी गती द्यावी आणि आपले शासकीय सेवेतील करिअरचे स्वप्न साकार करावे, असे आवाहन प्रशांत वावगे यांनी केले आहे.

VANARTI



### विद्यार्थ्यांनी 'वनार्टी'च्या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा: मंत्री अतुल सावे

धनगर प्रवर्गातील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांनी वनार्टीच्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाचा लाभ घेत शासकीय सेवेत प्रवेशाचे ध्येय साध्य करावे, असे आवाहन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा वनार्टीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी केले. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून प्रशासकीय व लष्करी सेवेत जाण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी वनार्टीच्या माध्यमातून दर्जेदार प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी मुदतीत अर्ज प्रक्रिया पूर्ण करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही अतुल सावे यांनी केले आहे.

## सालेकसा तालुक्यात पालकमंत्र्यांचा जनता दरबार घेण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे :** सालेकसा तालुक्यातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी सालेकसा तालुक्यात पालकमंत्री तथा राज्यमंत्री इंद्रनीलजी नाईक यांचा



जनता दरबार लवकरात लवकर आयोजित करण्यात यावा, या मागणीचे निवेदन देण्यात आले. दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गोंदिया येथील कार्यालयात गोंदिया जिल्ह्याचे विकास पुरुष खासदार प्रफुल्लभाईजी पटेल आणि लोकप्रिय नेते खासदार राजेंद्रजी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. सालेकसा तालुक्यात नागरिकांच्या विविध समस्या प्रलंबित असून, शेतकैयांच्या अडचणी, तालुक्यातील मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव तसेच विविध शासकीय विभागांशी संबंधित प्रश्न तातडीने सोडविण्याची गरज आहे. या समस्या संबंधित नागरिकांकडून थेट ऐकून त्यावर प्रभावी निर्णय घेण्यासाठी सालेकसा येथे जनता दरबार आयोजित करण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान खासदार राजेंद्र जैन यांनी पालकमंत्री तथा राज्यमंत्री इंद्रनीलजी नाईक यांच्याशी लवकरात लवकर सालेकसा तालुक्यात जनता दरबार आयोजित करण्याबाबत सूचना व विनंती केली. यावर पालकमंत्री इंद्रनीलजी नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच सालेकसा तालुक्यात जनता दरबार आयोजित करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. या जनता दरबारामुळे तालुक्यातील नागरिकांना आपल्या समस्या थेट पालकमंत्र्यांसमोर मांडण्याची संधी मिळणार असून, विविध शासकीय कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष डॉ. अजय उमाटे, राज्य सरचिटणीस ओबीसी आघाडी प्रभाकर दोनोडे, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, सालेकसा शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोणे, रिषी बैस यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वर्षाबेन पटेल यांची हाजरा फॉलला भेट, स्वच्छतेचा संदेश देत प्लास्टिक कचरा केला गोळा



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

सालेकसा तालुक्यातील निसर्गाच्या कुशीत वसलेला प्रसिद्ध हाजरा फॉल धबधबा येथील नैसर्गिक सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी दिनांक १६ ऑगस्ट रोजी वर्षाबेन पटेल यांनी हाजरा फॉलला भेट दिली. यावेळी त्यांनी परिसरातील निसर्गरम्य वातावरणाची पाहणी करून पर्यटनस्थळाच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती नवाटोला व वनविभाग सालेकसा यांच्या माध्यमातून हाजरा फॉल परिसरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये पर्यटकांसाठी अँडव्हेंचर गेम्स, लहान बालकांसाठी विविध मनोरंजनात्मक खेळ व इतर सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमांची माहिती वषार्बेन पटेल यांना देण्यात आली. या उपक्रमांचे त्यांनी कौतुक करत हाजरा फॉलचा विकास करताना पर्यावरणाचे संवर्धन आणि नैसर्गिक सौंदर्य जपणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. यावेळी वर्षाबेन पटेल यांनी ह्यवच्छ हाजरा फॉल, सुंदर हाजरा फॉल असा संदेश देत स्वतः प्लास्टिकचा कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला. पर्यटकांनी हाजरा फॉल परिसरात प्लास्टिक व इतर कचरा टाकू नये, स्वच्छता राखावी आणि या निसर्गरम्य स्थळाचे सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. भेटीदरम्यान त्यांनी हाजरा फॉल येथे उपस्थित पर्यटक, महिला तसेच दुकानदारांशी आपुलकीने संवाद साधला. स्थानिक नागरिकांच्या अडचणी व पर्यटनस्थळाच्या विकासाबाबतही त्यांनी माहिती घेतली. त्यांच्या या साधेपणाने आणि स्वच्छतेच्या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये सकारात्मक संदेश गेला.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सालेकसा शहर अध्यक्ष ब्रजभूषण बैस, संयुक्त वन व्यवस्थापन समिती नवाटोला अध्यक्ष गोविंदजी मरसकोल्हे, वनविभाग सालेकसा येथील राऊंड ऑफिसर जे. जी. खान, वनरक्षक जी. एस. पाऊलझगडे, वनरक्षक विनोद भांडारकर, वनरक्षक ए. एन. बारसे, ग्रामपंचायत सदस्य तथा समिती कर्मचारी ममता कोडवती, तालुका राष्ट्रवादी काँग्रेस युवती अध्यक्ष सुषमा राऊत, तालुका युवा उपाध्यक्ष ध्रुवकुमार हुकरे, संदीप राऊत, कु. प्रियंका ब्राह्मणकर, अंकुश सूर्यवंशी, अमित वैध यांच्यासह वनविभागाचे कर्मचारी, समितीचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. हाजरा फॉलसारख्या निसर्गरम्य पर्यटनस्थळाचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनासोबतच पर्यटक आणि स्थानिक नागरिकांनीही स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारावी, हा संदेश वर्षाबेन पटेल यांच्या या भेटीतून देण्यात आला.

## घर घर पेड, घर घर संदेश...!

## लायन्स क्लब ऑफ नागपूर का अनोखा उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

लायंस क्लब ऑफ नागपुर (डायमंड जुबली क्लब) द्वारा अपने प्रकृति संरक्षण अभियान के तहत सोमवार को पौधारोपण एवं पौधा वितरण कार्यक्रम का आयोजन किया गया। हिंगना रोड, नागपुर स्थित मैत्री परिवार द्वारा संचालित विद्यार्थी उन्नति गृह परिसर में क्लब के पदाधिकारियों एवं विद्यार्थियों की बड़ी संख्या में उपस्थिति रही। इस अवसर पर सभी ने पौधे लेकर प्रकृति संरक्षण का संदेश देते हुए एक रैली निकाली। इसके बाद आसपास के क्षेत्रों के घरों में पौधे वितरित किए गए. तथा लोगों को प्रकृति संरक्षण का संदेश दिया गया।

लायंस क्लब ऑफ नागपुर ने इस वर्ष प्रकृति संरक्षण अभियान के अंतर्गत १,००० पौधे लगाने का संकल्प लिया है। इसी अभियान के तहत सोमवार को लगभग १२५ पौधों का वितरण किया गया।

क्लब अध्यक्ष लायन विनोद गुप्ता ने बच्चों को पेड़ लगाने के फायदे बताए सचिव लायन सुनील कुहीकर ने बच्चों को वातावरण में पेड़ की कमी होने से होने वाले नुकसान के बारे में समझाया कोषाध्यक्ष लायन पियुष बारोट ने बच्चों को पेड़ सही तरीके से कैसे लगाए जाते हैं इसके बारे में जानकारी दी मैत्री परिवारके प्रकाश रथकंठीवार, बंडू भगत, लायन राजेश जिंदल, टखत्रः लायन निधीश सावरकर, टखत्रः लायन नितीन वर्मा, लायन रवि किशनपुरिया, लायन किशोर कुंजेकर, लायन स्नेहल बारोट तथा अन्य सदस्य इस अवसर पर प्रमुख रूप से उपस्थित थे। इस कार्यक्रम की प्रकल्प निर्देशिका लायन शीतल वर्मा एवं लायन नीलिमा सावरकर थी लायन्स क्लब के सदस्यों एवं विद्यार्थी उन्नति गृह के विद्यार्थियों ने आसपास के प्रत्येक घर तक पहुंचकर पौधे वितरित किए और प्रकृति संरक्षण का संदेश दिया। उन्होंने लोगों से अधिक से अधिक पौधे लगाने, जल संरक्षण करने तथा प्रकृति की रक्षा करने का आवाहन भी इस अवसर पर किया।

# नागपूर हीरो म्युरल मालिकेत भाऊ समर्थ यांचे जन्मशताब्दी वर्षानिमित्त म्युरल करण्यासाठी तसेच विविध उपक्रमासाठी महापौरांना निवेदन

### सहकार्याचे समितीला आश्वासन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे दिवंगत चित्रकार भाऊ समर्थ यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त नागपूर महानगरपालिकेने पूर्व हायकोर्ट मार्गावर दिवंगत मान्यवरांची जी म्युरल्स स्मारक मालिका, नागपूर हीरो म्हणून उभी केली आहे त्यात भाऊ समर्थ यांच्या माहितीसह त्या मालिकेत त्यांच्या म्युरलची भर नागपूर महानगरपालिकेने ते तयार करून घेऊन घालावी, तसेच वर्षभर चालणाऱ्या राष्ट्रीय महत्त्वाच्या विविध कलात्मक उपक्रमांसाठी आर्थिक सहकार्य व्हावे, या व अशा मागण्यांचे एक निवेदन, केंद्रीय मंत्री व नागपूरचे खासदार नितीन गडकरी यांची भेट भाऊ समर्थ जन्मशताब्दी समितीच्या वतीने अध्यक्ष डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी, कार्याध्यक्ष डॉ केशव भांडारकर, आणि संयुक्त कार्यवाह नानू नेवरे यांनी त्यांना दिले. १४ मार्च २०२७ पासून भाऊ समर्थ यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष सुरू होत आहे. ते वर्षभर विविध कलात्मक उपक्रमांच्या मालिकेद्वारे साजरे केले जाणार आहे.



त्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील मान्यवर प्रख्यात कवी अशोक बाजपेयी, लीलाधर मंडलोई, ज्येष्ठ संपादक प्रकाश दुबे आणि प्रा.फ.मुं.शिंदे हे संरक्षक,तर माजी राज्यपाल बनवारीलाल पुरोहित, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार,माजी राज्यसभा खासदार विजयबाबू दर्डा,माजी मंत्री डॉ. नितीन राऊत,माजी आमदार प्रा जोगेंद्र कवाडे, आमदार विकास ठाकरे, अभिजीत वंजारी, कृष्णा खोपडे, आमदार संजय भेंडे हे आश्रयदाते, डॉ शरद निंबाळकर,भ. मा. परसवाळे, कमलाकर धारप, महावीर जोंधळे, ताराचंद्र खांडेकर, इ.मो.नारनवरे, डॉ. अविनाश सप्रे, डॉ. सतीश सुळे, सुधीर सक्सेना, जयशंकर,मनोज रूपडा,राजन बावडेकर,प्रा प्रभाकर पाटील, डॉ. मनीषा पाटील, डॉ. किशोर इंगळे हे मार्गदर्शक, डॉ. राजेंद्र पटोरिया, प्रा.चंद्रकांत चन्ने, प्रा. मारूती शेळके, प्रवीण बर्दापूरकर, अनिल गडेकर, अविनाश महालक्ष्मे, डॉ. सागर खादीवाला, मनीष सोनी, डॉ. राजेंद्र मुंढे, सुभाष शर्मा, हरिहर पेंदे,हे उपाध्यक्ष, ॲड मुकेश समर्थ, डॉ पूरण मेश्राम,संजय शेंडे हे सह कार्याध्यक्ष, डॉ प्राची समर्थ,प्रा विकास जोशी हे कार्यवाह,प्रा विनोद चव्हाण,नानू नेवरे,शांतनू, सुनील पाटील, प्रा. अजय रायबोले, कमलेश समर्थ हे संयुक्त कार्यवाह तर प्रा. संजय जठार, मिलिंद लिंबेकर, अशोक तिडके,तुलसीता सुभाष,टीकाराम साहू,धर्मेश प्रमाणे, अशोक थार्सेकर,अरूण आसटकर, अतुल भुसारी,जयू भाटकर,प्रा प्रदीप मुक्तीबोध, मनोहर बिल्लोरे, प्रा.शिवाजी इंदापुरे, निशीकांत भालेराव,ॲड प्रकाश मेघे, डॉ.सतीश पावडे,संदीप राशिनकर, अरूणा पुरोहित (समर्थ), संजय भलमे आणि प्रदीप पवार अशा नागपुरातील, राज्यातील व देशातील कला, चित्रकला, साहित्य, पत्रकारिता, राजकारण अशा विविध क्षेत्रातील मान्यवर आणि जनप्रतिनिधी, आमदार,माजी मंत्री, माजी राज्यपाल अशा मान्यवरांचा समावेश असलेली भाऊ समर्थ जन्मशताब्दी समिती तयार करण्यात आली आहे.

थोडक्यात

## आमगाव येथे विद्यार्थी परिषदेची निवड; नेतृत्वगुणांना मिळणार व्यासपीठ



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

श्री लक्ष्मणराव मानकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे आज विद्यार्थी परिषदेची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे, महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे तसेच राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यासाठी विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा विद्यार्थी परिषद स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून महाविद्यालयीन उपक्रमांचे नियोजन व आयोजन, विद्यार्थ्यांच्या समस्या व सूचना प्रशासनापर्यंत पोहोचविणे, तसेच सामाजिक बांधिलकी आणि समाजकल्याणाच्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याची जबाबदारी परिषद पार पाडणार आहे. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये संघटन कौशल्य, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव विकसित होण्यास मदत होणार आहे.

नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुलसीदास निंबेकर यांनी विद्यार्थी प्रतिनिधींनी विविध शासकीय योजना व महाविद्यालयीन उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच प्रशासन आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी समन्वय साधण्यासाठी जबाबदारीने काम करावे, असे आवाहन केले. विद्यार्थी परिषदेमध्ये पवन अग्रवाल, डालेस कटरे, संकेत हनवते, अश्विनी दोनोळे, सनवेदी पडोळे, पार्थ नागपुरे, वैष्णवी कावळे, पारस चुटे आणि आयुष मेश्राम या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन अधिसभेमध्ये प्रतिनिधित्वाची संधी मिळाली. या निवडीबद्दल संस्थेचे कार्यवाह श्री. केशवराव मानकर तसेच तांत्रिक सल्लागार डॉ. डी. के. संघी यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कायासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. देवेंद्र बोरकर, प्रा. जितेंद्र शिवणकर, प्रा. चेतन बोरकर, प्रा. अनिल चोरी, प्रा. महेंद्र तिवारी, छत्रपाल चौधरी, आकाश जयस्वाल आणि रोशनी अग्रवाल यांनी सहकार्य केले.

## पदमपुर गावात गाजला कांवड यात्रेचा जयघोष

**शिवधाम महिला समितीच्यावतीने भवभूती नगर ते तुकडोजी चौकातील शिवमंदिरापर्यंत कांवड यात्रा; मोठ्या संख्येने शिवभक्तांचा सहभाग**



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त आमगाव तालुक्यातील पदमपुर गावात शिवधाम महिला समितीच्या वतीने भव्य कांवड यात्रेचे आयोजन करण्यात आले. भवभूती नगर, पदमपुर येथून सुरू झालेली ही कांवड यात्रा वाघ नदीपर्यंत नेण्यात आली. वाघ नदीचे पवित्र जल कावडीत घेऊन श्रद्धाळूंनी तुकडोजी चौक, पदमपुर येथील भगवान शिव मंदिरापर्यंत भक्तिभावाने यात्रा काढली. वाघ नदीतून पवित्र जल भरून कांवड यात्रेला सुरुवात करण्यात आली. यावेळी महिला, पुरुष, युवक तसेच मोठ्या संख्येने शिवभक्त सहभागी झाले होते. 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषाने संपूर्ण पदमपुर गाव भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेले. कांवड यात्रा मार्गावर ठिकठिकाणी श्रद्धाळूंचे स्वागत करण्यात आले. ढोल-ताशे आणि जयघोषामुळे यात्रेचा उत्साह अधिकच वाढला होता. शिवभक्तांमध्ये विशेष उत्साह आणि भक्तिभाव दिसून आला.

तुकडोजी चौकातील भगवान शिव मंदिरात कांवड यात्रा पोहोचल्यानंतर श्रद्धाळूंनी विधीवत पूजन-अर्चना केली. वाघ नदीतून आणलेल्या पवित्र जलाने भगवान महादेवाचा जलाभिषेक करण्यात आला. यावेळी परिसरातील नागरिकांच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि सर्वांगीण प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली. शिवधाम महिला समितीच्या वतीने आयोजित या कांवड यात्रेमुळे पदमपुर गावात दिवसभर धार्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. यात्रेत सहभागी झालेल्या भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली होती. कांवड यात्रा यशस्वी करण्यासाठी समितीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने श्रद्धाळू सहभागी झाल्याने यंदाची कांवड यात्रा पदमपुर गावातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. यावेळी मोना देशमुख,पूजा पाथोडे,शितल मेंढे,आरती बनवारिया, मिरा शहारे,अश्विनी ब्रम्हणकर,संगीता बागडे,विनिता येवले,शिला हुकरे,कोमल हुकरे संगीता डोये तसेच मोठ्या संख्येने श्रद्धालु गावकरी, महिला पुरुष उपस्थित होते.

## मेट्रो-१३ कशी असणार?

**वृत्तसंस्था, मुंबई**

ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतून जाणाऱ्या मेट्रो १३ - मीरा भाईंदर ते वसई-विरार मार्गाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च १७,७२४.९९ कोटी अपेक्षित आहे. या मार्गाची एकूण लांबी २५.०३ किलोमीटर असून, त्यापैकी २१.७८ किलोमीटर मार्ग उन्नत, तर ३.२५ किलोमीटर मार्ग भूमिगत असेल. या मार्गावर एकूण १६ स्थानके प्रस्तावित आहेत. त्यामध्ये १३ उन्नत आणि ३ भूमिगत स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पात मेट्रो मार्गासह ४.९२ किलोमीटर लांबीच्या वसई खाडीवरील पांजू बेटाला जोडणाऱ्या सहा पदरी (३+३) रस्ता आणि मेट्रोच्या एकत्रित पुलाचे नियोजन करण्यात आले आहे. चिखल डोंगरी येथे मेट्रो डेपो प्रस्तावित आहे. हा मार्ग मीरा रोड, वसई, नालासोपारा, नायगाव आणि विरार परिसरांना जोडणार आहे.

# 'वंदे मातरम्' कायद्याची कसोटी

झाडाझडती



विनोद देशमुख

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात वन्दे मातरम् हे दोन शब्द स्फूर्तिमंत्र ठरले होते. फासावर जातानाही क्रांतिकारक हेच शब्द उच्चारून मातृभूमीचा निरोप घेत असत. आंदोलनांमध्ये, सभांमध्ये हेच दोन शब्द आवर्जून उच्चारले जात असत. एवढा प्रभाव जनमानसावर पडला होता. म्हणूनच १९५० मध्ये जन गण मन राष्ट्रगीतासोबतच राष्ट्रगान म्हणून वंदे मातरम् (दोनच कडव्यांचं का होईना) आपण स्वीकारलं. मात्र, या मंत्राला नेहमीच दुय्यम वागणूक देण्यात आली आणि राजकारणापायी त्याला वादाच्या भोवऱ्यात फिरवत ठेवण्यात आलं, हा इतिहास आहे.

अगदी यंदा या मंत्राची सार्ध शताब्दी (१५० वर्षे) साजरी होत असताना सुद्धा वाद झालाच! काँग्रेस पक्षाची आणि वंदे मातरम्ची काय जन्माची दुष्मनी आहे माहीत नाही; पण त्यांच्याच कार्यक्रमात यावेळचा अपप्रसंग घडला. त्याबद्दल काँग्रेसनेते आता सारवासारव करीत आहेत. पण त्यावर कोणाचाच विश्वास बसताना दिसत नाही. राजधानी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात रविवारी सकाळी हा जो प्रसंग घडला आणि ज्याचा व्हिडिओ अनेकांनी पाहिला, तो असा-

स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम सुरू करताना वंदे मातरम्ची कॅसेट लावण्यात आली. यावेळी पक्षाच्या सर्वेसर्वा सोनिया गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे एका बाजूला, तर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर नेते दुसऱ्या बाजूला, पण एका रेषेत ध्वजस्तंभाजवळ उभे होते. राष्ट्रगानाचे पहिले दोन कडवे सुरळीत पार पडले. तिसरं कडवं सुरू होताच सोनिया गांधींनी खरगेंना काहीतरी म्हटल्याचं आणि त्यांच्यात काही बोलाचाली झाल्याचं व्हिडिओत दिसलं. दुसऱ्या बाजूच्या राहुल गांधींच्या चेहऱ्यावरही हालचाल जाणवली. त्यांनी एकाला बोलावलं. तो माणूस खरगेंजवळ आला. सोनिया गांधी मागे जाऊन त्याच्याशी काही बोलल्या. या संपूर्ण काळात वंदे मातरम् सुरूच राहिलं. तिसरं, चौथं, पाचवं कडवं पूर्ण होऊनच ते संपलं. फक्त पहिल्या दोन कडव्यांनाच अधिकृतता प्रदान करणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या व्यासपीठावरूनच संपूर्ण वंदे मातरम् गायलं जाण्याचं आक्रीत पहिल्यांदाच घडलं. ते अगतिकपणे पाहणारे सोनिया, खरगे, राहुल म्हणूनच अस्वस्थ झाले असावेत.

ही घटना व्हायरल होताच देशभरातून प्रतिक्रिया उमटायला लागल्या. सर्वात पहिली प्रतिक्रिया आली. "हा सरळसरळ वंदे मातरम्चा अवमान आहे. काँग्रेस पक्षानं माफी मागितली पाहिजे." यावर काँग्रेसनेते सारवासारव करू लागले. खरगे यांच्यासाठी खुर्ची मागवण्यासंबंधी सोनिया गांधी बोलल्या (जी खुर्ची आलीही नाही आणि कोणाला दिसलीही नाही) असं सांगितलं जाऊ लागलं. हे पाहून विरोध आणखी वाढला. तिसऱ्या कडव्यापासून वंदे मातरम् बंद पाडण्याचे प्रयत्न सोनिया, खरगे वगैरेंनी केले, असा आरोप समूह माध्यमे, टीव्ही वगैरेंवरून होऊ लागला. अवमान कारवाईची मागणी जोर धरू लागली. चार पोलिस ठाण्यांमध्ये तक्रारी झाल्या. आता प्रकरण या टप्प्यावर आलं आहे की- "संपूर्ण पाच कडवे गायनाचा जो नवीन कायदा झाला आहे त्याअंतर्गत सोनिया, खरगे, राहुल यांच्यावर कारवाई झाली पाहिजे !"

हा व्हिडिओ पाहणारा कोणीही सांगू शकेल की, ते दृश्य खुर्चीशी किंवा इतर विषयाशी संबंधित नव्हतंच. सोनिया गांधींच्या हावभावावरून स्पष्ट जाणवत होतं की, तिसरं कडवं सुरू झाल्यामुळे त्या चकित आणि काहीशा संतप्त झाल्या आहेत. म्हणूनच याकडे खरगेंचं लक्ष वेधत आहेत, सेवकाला सूचना देत आहेत. दुरून पाहणाऱ्यांना तरी तसंच वाटत होतं. तथापि, तसं नसेलही असं आपण क्षणभर गृहीत धरलं तरीही, त्या प्रसंगात वंदे मातरम्चा अवमान मात्र झालेलाच आहे, हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही. कारण, राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान हे दोन्ही शिस्तीत ऐकणं बंधनकारक आहे. येथे तर, एकीकडे राष्ट्रगान सुरू आहे आणि त्याचवेळी ३-४ जण हालचाल करीत आहेत, एकमेकांशी बोलत आहेत, इशारे करीत आहेत... ही कुठली शिस्त? उलट, ही बेशिस्त आहे आणि त्यातून राष्ट्रगानाच्या धडधडीत अवमानाचा गुन्हा उघड्यावर घडलेला आहे. त्यामुळे नव्या कायद्यानुसार या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे आणि त्यांना योग्य ती शिक्षा दिली गेली पाहिजे. तरच हा कायदा करण्याला काही अर्थ राहील आणि भविष्यासाठी त्याचा धाक निर्माण होईल.

हा कायदा नसेस्तोवर दोन कडव्यांच्या तरतुदीचा गैरफायदा घेत काही लोकांनी संपूर्ण वंदे मातरम् सतत टाळलं. परंतु आता ते खपवून घेतलं जाणार नाही, असा स्पष्ट संदेश जनमानसात जाण्याच्या दृष्टीनं वरील सर्व व्हीआयपींवर तातडीनं कारवाई होणं आवश्यक आहे. अंमलबजावणी ढिसाळ असेल तर कायदा कागदावरच राहून काहीही साध्य होणार नाही. हे सर्वांनाच कळत, पण ते वळलं पाहिजे ना !

याच निमित्तानं आणखी एक विषय. राहुल गांधी स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य सोहळ्याला यावर्षीही गैरहजर राहिले. हे त्यांच्या बाजूनं चुकीचंच घडलं आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेत्यानं इतकं बेजबाबदार वागायला नको. पण... २०२४ मध्ये त्यांना मागच्या रांगेत बसवलं गेल्याची ही प्रतिक्रिया असल्याचं सांगितलं जातं. विरोधी पक्षनेता हा भविष्यातील संभाव्य पंतप्रधान असतो. सभागृहाचा विचार केला तर तो पंतप्रधानांखालोखाल क्रमांक दोनचा नेता ठरतो. संसदीय लोकशाहीत त्याचा मानसन्मान राखला गेला पाहिजे. (भलेही तो स्वतः बेताल वागत असेल.) कुठल्याही शासकीय कार्यक्रमात विरोधी पक्षनेत्याला शक्यतो व्यासपीठावर किंवा समोरही पहिल्या रांगेत स्थान द्यायला हवं. सरकारचे मंत्री पहिल्या रांगेत अन् विरोधी पक्षनेता मात्र मागच्या रांगेत, हा कुठला प्रोटोकॉल आहे. यासंदर्भातील तरतुदींमध्ये सुधारणा करून विरोधी पक्षनेत्याला कायम पहिल्या रांगेत स्थान मिळण्याची सोय केली पाहिजे. केन्द्र आणि सर्व राज्य सरकारांनी, तसंच शासकीय संस्थांनी हे पथ्य पाळण्याची गरज आहे.

**- ज्येष्ठ पत्रकार, नागपूर**



## बेसा नगरपंचायतीच्या कामाचा 'झोल', नागरिकांचा हल्लाबोल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नव्या नागपुरची ओळख असलेले बेसा, पिपळा, बेलतरोडी, घोगली हा भाग. या भागात नागरिकांसाठी सर्व प्रकारच्या सोयी, सुविधा देण्याचे काम प्रगतीपथावर आहे. अशातच नगरपंचायतीच्या विकासकामांमुळे नागरिकांना अनेक समस्यांचा सामनाही करावा लागत आहे. कादंबिनी विहार येथील, स्वामी समर्थ अपार्टमेंट-१ येथे अश्याच विकासकामांमुळे नागरिकांचे बाहेर निघणेही कठीण झाले आहे.

या अपार्टमेंटमधील नागरिकांचा येण्या-जाण्याचा मार्ग एकच असून येथील मुख्य मार्गावरच नगरपंचायतीच्यावतीने सिवरेज लाईनसाठी पाईप टाकण्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे नगरपंचायत कर्मचाऱ्यांना मंगळवारी नागरिकांच्या रोषाचा सामना करावा लागला. या अपार्टमेंटमध्ये जवळपास ५२ कुटूंब वास्तव्यास असून २०० नागरिकांचा समावेश आहे. येथे मुख्य मार्गावरच झालेल्या खोदकामामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पर्यायी मार्गाची व्यवस्था करण्याचा प्रयत्न केल्यास काही दुकानदारांनी विरोध दर्शविला. वेळीच बेलतरोडी पोलिस स्टेशनला सुचना देण्यात आली. पोलिस कर्मचाऱ्यांच्या मदतीने रोष निवळला असला तरी पर्यायी मार्ग मात्र खुला करण्यात आला नाही. त्यामुळे उपस्थित नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी याच चिखलातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. पावसाळ्यातच प्रशासनाला खोदकाम सुचतात काय? आणि पर्यायी व्यवस्था न करता नियोजनशून्य कामावर ताशेरेही ओढले. शिवाय जमिनीखाली पाईप टाकताना सिमेंटचे काँक्रीटही करण्यात आले नाही. त्यामुळे काही काळानंतर चिखलामुळे पाईप दबण्याची शंकाही उपस्थित नागरिकांनी यावेळी व्यक्त केली. पाईप खचल्यानंतर पुन्हा याच कामाच्या दुरूस्तीसाठी जनतेचा निधी आणि नागरिकांच्या सहनशिलतेचा अंत प्रशासन बघत आहे काय, असा संतप्त सवालही यावेळी नागरिकांनी केला. **(छायाचित्र : दै. सिंहवाणी वृत्त)**

## पुणे रिंगरोड पूर्व विस्तारासाठी १० हजार पाचशे कोटींच्या प्रस्तावास मान्यता

**वृत्तसंस्था, पुणे**

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रस्तावित पुणे रिंग रोडच्या पूर्व विस्तारीकरण प्रकल्पाच्या १०,५०२.३६ कोटींच्या सुधारित प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात आली असून महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत या मार्गाचे काम करण्यात येणार आहे. पुणे-सोलापूर रस्त्यावरील सोरतापवाडी (वळती) ते पुणे-सातारा रस्त्यावरील वरवे (बु.) (शिवरे) या ३१.८०५ किलोमीटर लांबीच्या प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्गाचा या प्रकल्पात समावेश आहे. आंतरराज्य आणि राज्यांतर्गत वाहतूक पुणे शहरात न आणता शहराबाहेरून वळवून वाहतूक कोंडी कमी करणे हा या रिंग रोडचा उद्देश आहे. संपूर्ण १६८.९८१ किलोमीटर लांबीच्या प्रकल्पाची सलगता सुनिश्चित झाल्यानंतर एकात्मिक प्रवेश नियंत्रित मार्गिका पूर्ण होणार आहे.

## गोतमारे गुरुकुलतर्फे वृक्षारोपण

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर:** गोतमारे शास्त्र आणि शास्त्र गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी 'झाडे लावा, निसर्ग वाचवा' अशी घोषणा देत हातात विविध प्रकारची झाडे घेऊन शहराच्या मुख्य रस्त्यांवरून पदयात्रा काढली. ते सावनेर पोलीस ठाण्यात पोहोचले आणि पोलीस विभागाकडून माहिती घेतली. नंतर, शहरातील मान्यवरांनी शहराच्या लागत असलेल्या महामार्गांच्या दुतर्फा झाडे लावून पर्यावरणाच्या संतुलनाबद्दल जनजागृती केली.



गोतमारे गुरुकुलचे संस्थापक भाऊ गोतमारे यांच्या नेतृत्वाखाली गोतमारे गुरुकुल चे विद्यार्थी मार्ग भ्रमण करत होते तेव्हा विविध ठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले आणि त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा करण्यात आली. सेवकरी परिवारातील भूषण कुबडे आणि निखिल पोटभारे, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे, किशोर धुंडेले,प्रा. योगेश पाटील,अँड्. भोजराज सोनकुसरे,युवा व्यावसायिक प्रकाश बालपांडे, प्रवीण रासेकर, शफीक सय्यद, डॉ. रोशन निनावे, सर्पमित्र शुभम ठाकूर, सावनेर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर, समाजसेवक भूषण कुबडे आणि त्यांच्या सेवेकरी परिवाराव्दारे विद्यार्थ्यांना फळे वितरित करण्यात आली.

## गांधी पुतळा परिसरात मेहबूब शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर :** भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त तालुक्यातील खापा शहरात देशभक्तीपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून स्वातंत्र्यसंग्रामातील शहीदांना अभिवादन करण्यात आले. खापा शहरातील बाजार चौक येथील महात्मा गांधी पुतळा परिसरात ज्येष्ठ नागरिक मेहबूब शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी देशाच्या स्वातंत्र्याचा अभिमान आणि राष्ट्रभक्तीची भावना व्यक्त केली. यावेळी नगर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुरेश चंद्रवंशी, अशोक ददे, शमशेर शेख, अफसर (बबलू) शेख, योगेश गोखे,उपाध्यक्ष सुनील पाहुणे, नगरसेवक नामदेव गजभिये, मिलिंद बुरडे, संजय सोनकुसळे, आशिष ढाले, गणेश आके, छगन कवळे, वैशाली लाड, कविता धराळे, मनोरमा श्रियाम, लिला बागडे, प्रेमिला बोकडे (भुते), रवी परतेती, अंजली मेनकुदळे, वैशाली चंद्रकांत लिखार, किशोर आष्टनकर, रोशनी शेखर डेरे, प्रशांत तुमाने, शोभा कारणकर (मानकर), निखिल आष्टनकर, पुष्पेंद्र शर्मा यांच्यासह नगर परिषद कर्मचारी, पोलीस पथक, होमगार्ड, विविध शाळांतील विद्यार्थी-शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, राष्ट्रीय गीत, राज्यगीत आणि झेंडा गीत सुरेल आवाजात सादर केले. त्यामुळे परिसरात देशभक्तीचा उत्साह निर्माण झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश लष्करे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सेवादल अध्यक्ष नारायण लांबट यांनी मानले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने झालेल्या या कार्यक्रमातून राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि देशप्रेमाचा संदेश देण्यात आला.

# केळवदच्या कमांडो अकॅडमी मालकाला अटक

## अल्पवयीन विद्यार्थिनीशी छेडछाड प्रकार

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

तालुक्यातील केळवद पोलीस स्टेशन अंतर्गत शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारा प्रकार उघडकीस आल्याने पालकवर्गात कमालीची संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार केळवद येथील 'कमांडो आर्मी पोलिस करिअर अकॅडमी सैनिक स्कूल'मधील अल्पवयीन विद्यार्थिनीशी छेडछाड करणाऱ्या अकॅडमी मालक हरिश्चंद्र राणे



(३८, रा. सावनेर) याला 'पॉक्सो' अंतर्गत नागपूर मध्यवर्ती कारागृहात रवाना करण्यात आले आहे. जून २०२६ मध्ये आरोपीने विद्यार्थिनीला ऑफिसमागे बोलावून छेडछाड केल्याची तक्रार केळवद पोलिसांत नोंदवण्यात आली होती. त्याअनुषंगाने केळवद पोलीसांनी ऑंकाडमी आरोपी ला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

**शिक्षण विभागाचे दुर्लक्ष ?**

अनेक वर्षांपासून बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या या कमांडो अकॅडमीवर शिक्षण विभागाची नजर कशी पडली नाही, असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. विनापरवाना शाळा चालवून पालकांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या अकॅडमी मालकावर कडक कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.

या घटनेनंतर सावनेर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अभिजीत कावळे व पथकाने अकॅडमीची पाहणी केली असता, ही संस्था कोणत्याही परवानगीशिवाय अनेक वर्षापासून सुरू असल्याचे निष्पन्न झाले. अकॅडमीत ७० विद्यार्थी असून त्यातील ३ री ते ८ वीच्या २१ विद्यार्थ्यांचे कुठल्याच शाळेत प्रवेश नाहीत, तरीही पालकांकडून १ लाख रुपये फी उकळली जात होती. अधिकाऱ्यांनी पालकांना बोलावून विद्यार्थ्यांचा ताबा त्यांच्याकडे सोपवला.

असाच प्रकार झपाट्याने वाढत असलेल्या शिकवणी वर्गात ही घडत असल्याचे दबक्या आवाजात बोलले जात असुन अश्या शिकवणी वर्गावर कुणाचे ही लक्ष नसल्याने मोठ्या फी आकारुण छोट्या छोट्या खोल्यांमध्ये अनेको अनेक विद्यार्थी विद्याथीर्नींना बसवून सर्रासपणे सुरु आहे यावर ही गटशिक्षणाधिकारी यांनी पाळत ठेवावी अशी मागणी जोर धरु लागली आहे.